# संपादकीय

बदल हाच जीवनाचा स्थायी भाव आहे. कोणताही बदल हा बहुपरिणामी असतो. ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. त्यामुळे समाजातील अनेकविध बदलांचे परिणाम ग्रंथालयावर होत असतात. तसेच ग्रंथालयीन बदलांचे परिणाम ग्रंथालयांच्या उपभोक्त्यांवर होत असतात. अंकीय ग्रंथालय (डिजिटल लायब्ररी) हा ग्रंथालय क्षेत्रातील अलीकडचा सर्वांत लक्षणीय बदल आहे.

सध्या माहिती-तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर ग्रंथालये करीत आहेत. माहिती-तंत्रज्ञानाच्या वापरातून अंकीय ग्रंथालये विकसित होत आहेत. अंकीय ग्रंथालयांची क्षमता पारंपरिक ग्रंथालयांपेक्षा सर्वार्थाने जास्त आहे. परिणामी या ग्रंथालयांद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांची परिणामकारकताही पारंपरिक ग्रंथालयांपेक्षा अधिक असणे अपेक्षित आहे. विशिष्ट यंत्रणेची अपेक्षित क्षमता आणि तिची प्रत्यक्षातील क्षमता यातील फरकाचा आढावा लेखापरीक्षणाद्वारे (Audit) घेतला जातो. लेखापरीक्षण हे गुणवत्ता तपासण्याचे साधन आहे. तसेच ते एक व्यवस्थापकीय नियंत्रणाचे तंत्र आहे.

अंकीय ग्रंथालयाच्या सेवा, त्यांचे लेखापरीक्षण आणि नियंत्रण याबाबतची माहिती विजय देवधर यांनी त्यांच्या 'अंकीय ग्रंथालय सेवा आणि नियंत्रण' या लेखात दिली आहे.

साक्षरता ही अनेक प्रकारची असते. जसे- लिहण्या-वाचण्याची साक्षरता, तांत्रिक, संगणक साक्षरता, इत्यादी. माहिती साक्षरता (Information Literacy) ही या मालिकेतील अलीकडची जाणीव आहे. कोणत्याही साक्षरतेमुळे संबंधित विषयाबाबतच्या ज्ञानाबरोबर कौशल्यामध्येही वाढ होते. याच विचारधारणेतून सध्या युनेस्कोपासून ते भारतातील NAAC पर्यंतच्या सर्व यंत्रणा माहिती साक्षरता साध्य करण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न करत आहेत; उपक्रम राबवीत आहेत; प्रोत्साहन देत आहेत. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयीन पातळीवर माहिती साक्षरता निर्माण करण्यासाठी काय करता येईल याची चर्चा मोहन खेरडे यांनी 'महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती साक्षरता' या लेखात केली आहे.

सार्वजनिक ग्रंथालये ही खऱ्या अर्थाने 'लोक विद्यापीठे' आहेत. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ही 'विद्यापीठे' अधिकाधिक सक्षम होणे आवश्यक आहे. भारत सरकारचे RRRLF हे प्रतिष्ठान सार्वजनिक ग्रंथालयांना अधिक सक्षम करण्यासाठी, त्यांच्या सेवांमध्ये



विविधता, परिपूर्णता, परिणामकारकता आणण्यासाठी आर्थिक आणि मार्गदर्शनात्मक मदत करते. RRRLF च्या विविध योजनांची सविस्तर माहिती धर्मराज वीर यांनी त्यांच्या 'RRRLF : सार्वजनिक ग्रंथालयांसाठी वरदान' या लेखात दिली आहे.

ग्रंथालयातील वाचनसाहित्य रद्दबातल करणे ही वाचनसाहित्य संग्रह विकास कार्यक्रमातील एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. ग्रंथालयातील वाचनसाहित्य अनेक कारणांमुळे रद्दबातल करावे लागते. रद्दबातल केलेल्या ग्रंथांच्या विक्रीतून काही प्रमाणात का होईना आर्थिक उत्पन्न मिळविणे शक्य आहे. याबाबतचा प्रत्यक्ष अनुभव प्रकाश बोडके यांनी 'रद्दबातल ग्रंथांची विक्री : एक अनुभव' या लेखात कथन केलेला आहे.

वर नमूद केलेल्या लेखांशिवाय सदरच्या अंकामध्ये ग्रंथपरिचय, अजून ताजा वास जुन्याला, वेब परिचय ही सदरे आहेत. याशिवाय २००५-२००६ या शैक्षणिक वर्षामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एम. लिब. च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्प विषयांची यादीही या अंकात दिलेली आहे. सन २००६-२००७ या शैक्षणिक वर्षात एम. लिब.ला. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना प्रकल्पाचे विषय निवडण्यासाठी सदर यादीचा उपयोग होणार आहे. सदर अंकातील माहिती वाचकांना उद्‌बोधक ठरेल अशी खात्री आहे.

**– संपादक**

❑❑❑

# अंकीय ग्रंथालय सेवा : लेखापरीक्षण आणि नियंत्रण

विजय देवधर

*अंकीय ग्रंथालयात अंतर्भूत आहे सुसंवादीय आणि सुसंचयित अंकीय माहिती व्यवस्था. अंकीय ग्रंथालयांची कार्यक्षमता आणि उपयुक्तता वाढविण्यासाठी माहिती व्यवस्थेच्या सुनियोजित आणि परिणामकारक नियंत्रणाची गरज आहे. माहिती व्यवस्थेचे लेखापरीक्षण आणि नियंत्रण इतर माहिती व्यवस्थापनात सध्या वापरले जात आहे आणि त्याची उपयुक्तता सिद्ध झाली आहे. यात ई-बँकिंग, ई-गव्हर्नन्स, इत्यादी व्यवस्थापने येतात. अंकीय ग्रंथालयांकडून जास्तीत जास्त लाभ मिळविण्यासाठी लेखापरीक्षण आणि नियंत्रण पद्धती अमलात आणल्या पाहिजेत. या लेखाद्वारे लेखापरीक्षण आणि नियंत्रणाबद्दलचे प्रश्न, समस्या आणि घटक यांवर प्रकाश टाकण्याचा एक प्रयास आहे.*

## प्रस्तावना

अंकीय ग्रंथालय या संकल्पनेत अंतर्भूत आहे ते अंकीय स्वरूपात साठविलेली माहिती जी अंकीय माध्यमांद्वारेच आणि जाळ्यामार्फत त्याच्या वापरकर्त्यांना वापरता येईल, ज्यात हा माहितीचा स्रोत एकाच ठिकाणी असण्याची आवश्यकता नाही. माहितीचा स्रोत म्हणून अंकीय ग्रंथालय पारंपरिक ग्रंथालयांसाठी साधर्म्य आहे जे केवळ भासमान आहे. हे परिपूर्ण स्वयंचलित स्वरूपाचे असून त्यातील संपदाही केवळ अंकीय स्वरूपात आहे. अंकीय ग्रंथालयाचा उगम हा पारंपरिक ग्रंथालयावर अवलंबून आहे. पारंपारिक ग्रंथालयात वाचनसाहित्याचे संकलन, संस्करण, साठवण आणि वाचकांना वितरण त्याचबरोबर साहित्याचे जतन केले जाते. या वाचनसाहित्यात



पुस्तके, मासिके, नियतकालिके, दृकश्राव्य स्वरूपातील साहित्य, नकाशे, इत्यादी वाचनसाहित्याचा समावेश होतो. अंकीय तंत्रज्ञानाच्या लवचीकतेमुळे हे नवीन स्वरूपातील साहित्य सुलभपणे हाताळण्यास उपयोगी पडत आहे. अंकीय स्वरूपाच्या साहित्याचे प्रत्यक्षात असणे गरजेचे नाही. छापील स्वरूपातील वाचनसाहित्याच्या वाढलेल्या किमती, ग्रंथालयांना जागा, साहित्य ठेवण्यासाठी कपाटे याची चणचण तसेच घटत जाणारे अनुदान यामुळे ग्रंथालयांना वाचनसाहित्य आणि मासिकांची खरेदी यात बरीच काटछाट करावी लागत आहे. यास एक फायदेशीर स्वस्त असा पर्याय उपलब्ध झाला आहे तो वाचनसाहित्याचे अंकीय स्वरूप. तंत्रज्ञानात होणाऱ्या बदलांमुळे यांच्या किमती पण कमी होत आहेत. त्यामुळे ग्रंथालयांना आता एक चांगला पर्याय पुढे आला आहे.

## अंकीय ग्रंथालयाची वाचनसाहित्य संपदा

वाचनसाहित्य हे अंकीय ग्रंथालयांचे हृदय आहे आणि हृदयाशिवाय माणूस ही कल्पना जशी अशक्य कोटीतील आहे  तसेच वाचनसाहित्याशिवाय ग्रंथालय ही कल्पना पण त्याच तऱ्हेची आहे. अंकीय ग्रंथालयातील वाचनसाहित्य म्हणजे केवळ जे पारंपारिक ग्रंथालयात आढळते ते पुस्तके, मासिके, नियतकालिके, चित्रे, नकाशे, दृकश्राव्य याचबरोबर पारंपरिक ग्रंथालयात परिचित नसणारे असे बहुभाषिक, बहुमाध्यमांची आणि सुरचित वाचनसाहित्य खंडांत विभागलेली पुस्तके, त्यातील पुस्तके ज्यांची विभागणी, त्यातील खंड, विभाग, उपविभाग, आकडेवारी, रंगीत रेखाचित्रे, चित्रे, सूच्या, ध्वनी आणि चित्र अशा स्वरूपात असेल. याशिवाय आज्ञावली, वृत्तमाध्यम, प्रचलित वाचनसाहित्याचे सादरीकरण त्याच्या उपयोगावर अवलंबून असते. काही उपयोजनेत सुरक्षा व्यवस्थेसह उच्च गतिमान प्रतिमा हव्या असतात; तर मुलांसाठी कमी गतीच्या प्रतिमा ज्या छापून घेणे शक्य आहे. अंकीय ग्रंथालयातील साहित्य लहान, परिपूर्ण आणि मर्यादित अशा संग्रहापासून भौतिक आणि तार्किक प्रशस्त जागेत विस्तारलेले असे वाचन-साहित्य आहे. मार्गदर्शक, विखुरलेल्या माहितीची हाताळणी करण्याची कार्यक्षमता ही अंकीय ग्रंथालयाची सर्वसामान्य आवश्यकता आहे.

## अंकीय ग्रंथालयात माहितीची साठवण आणि तिचे वितरण

माहितीच्या साठवण आणि वितरण प्रक्रियेत माहितीचे सादरीकरण, संघटन आणि त्या दृष्टीने संस्करण, साठवण या प्रक्रिया महत्त्वाच्या आहेत. यातील अंतिम हेतू हा माहितीची सुलभतेने उपलब्धी हाच आहे. या प्रक्रियेचा प्रधान हेतू वाचकास त्यास हवी असलेली माहिती त्याने विचारलेल्या प्रश्नांस अनुसरून कमीत कमी वेळात आणि अचूक देणे हा आहे. ही गोष्ट किती कठीण आहे याचा अनुभव अनेकांना निरनिराळ्या शोधयंत्रांवरून माहितीचा शोध घेत असताना आलेला आहे. याच दृष्टिकोनातून पाहता अंकीय ग्रंथालय म्हणजे माहिती साठवण आणि वितरण प्रक्रियेची वाढवलेली आवृत्तीच म्हणावे लागेल. त्यात अनेक माध्यमे आणि संस्थांचा सहभाग आहे. दुसऱ्या बाजूने पाहता अंकीय ग्रंथालये म्हणजे माहितीच्या साठवण

आणि वितरण प्रक्रियेच्या उपयोजिततेचे एक उत्तम उदाहरण आहे. विविध स्तरांतील वाचकांना सहज सुलभपणे वापरता येणारी आणि उच्चतम कोटीची उपयुक्तता देण्यासाठी माहिती साठवण, संस्करण आणि वितरणप्रक्रिया आवश्यक आहे. या दृष्टीने जागतिक पातळीवर संशोधन चालू असून त्यात बहुभाषिक प्रक्रिया, अनेक पैलू आणि रचनात्मक माहिती संच, हायपर टेक्स्ट, हायपर माध्यमातून मजकूर, माहितीचे पूर्वानुलोकन, अतिशय गुंतागुंतीच्या वाचनसाहित्याची हाताळणी, शोधप्रक्रियेसाठी प्रमाणके आणि माहिती व्यवस्थेची रचना आदी महत्त्वाच्या घटकांवर संशोधन चालू आहे.

## अंकीय ग्रंथालयाचे मूल्यांकन

अंकीय ग्रंथालयाचे मूल्यांकन करताना कोणकोणते घटक, गट विचारात घ्यावे लागतील यावर सर्वच स्तरांवर विचारमंथन चालू आहे. अंकीय ग्रंथालय मूल्यांकनाचे घटक ठरविताना उपभोक्ता आणि निर्माता यांचे विचार लक्षात घेणे आवश्यक आहे. निर्मात्यांच्या दृष्टिकोनांतून अंकीय ग्रंथालयाची क्षमता ज्यात साठविलेल्या माहितीची घनता आणि ती एकाच वेळी वापरू शकणाऱ्या वाचकांचा आकडा हा महत्त्वाचा घटक आहे. त्याचबरोबर माहितीचे स्वरूप देवघेवीचा वेग यात (शोधप्रक्रियेचा वेग अभिप्रेत आहे.) वापरणाऱ्यांच्या दृष्टिकोनातून व्यवस्थेचा वाचकांवर होणारा परिणाम यात अंकीय स्वरूपातील माहिती हाताळण्याची वाचकांची आवड, क्षमता, परिणामाकारकता (अचूक उत्तरे, उत्तरांचे वर्गीकरण, रचना करण्याची उपलब्धी, अचूक ते उतरता क्रम), उपयुक्तता (सुलभ पद्धती, हेतूस आणि वापरणाऱ्याच्या प्रयत्नास दाद देणारी), व्यवस्थेबरोबर सुसंवाद आणि अखेर वाचकाचे समाधान हाच अंतिम हेतू आहे.

थोडक्यात, अंकीय ग्रंथालयाचे मूल्यांकन करताना कोणत्या घटकांचा समावेश असावा त्याचा तपशील पुढीलप्रमाणे –

- अंकीय वाचनसाहित्य आणि माहितीचे स्रोत
- प्रसार माध्यमाची निवड आणि संग्रह
- वाटप, जोड दुवा
- सुसंघटन, रचना, संचय
- मेटाडाटा उकल / उलगडा, प्रतिनिधित्व
- व्यवस्थापन, कृती सेवकवर्ग
- जोपासना चिकाटी / दीर्घोद्योग
- प्रवेश मार्ग
- भौतिक जाळे
- वाटप
- संगणक मध्यस्त, संपर्क / देवाणघेवाण



- शोध, प्रतिपाप्ती
- सेवा
- उपलब्धता
- उपलब्ध सेवांची व्याप्ती, प्रसार आणि वितरण
- साहाय्य / मदत, संदर्भित
- उपयोग, उपभोक्ते
- सुरक्षा, गुप्तता, धोरण, कायदेशीर बाजू / दृष्टिकोन, परवाने
- मूल्यांकन / मूल्य अर्थकारण
- इतर माहितीस्रोतांशी आणि ग्रंथालयांशी एकात्मता / एकत्रीकरण आणि सहकार्य

## माहिती यंत्रणेचे लेखापरीक्षण

आपल्या माहिती यंत्रणेतील कच्चे दुवे, बलस्थाने, जाणून घेण्यासाठी ठरावीक काळानंतर केला जाणारा यंत्रणेचा अभ्यास म्हणजेच माहिती यंत्रणेचे लेखापरीक्षण होय. हे परीक्षण सर्वसमावेशक / परिपूर्ण, पद्धतशीर, स्वावलंबी / स्वतंत्र अशा प्रकारचे असेल; कारण त्यात माहिती यंत्रणेतील सर्व बाबींचे, बाह्य परिस्थितीचे ठळक आणि सूक्ष्म, कार्याशी निगडित असे परीक्षण केले जाते. माहिती यंत्रणेच्या लेखापरीक्षणाची संकल्पना ही हिशेबांच्या आर्थिक लेखापरीक्षणातून सुचली आहे. अशा प्रकारचे लेखापरीक्षण करण्याचा मुख्य हेतू हा की संस्था आर्थिक आणि वैधानिक कायदेशीर मापदंडानुसार कार्य करीत आहे का नाही ते पाहणे. माहिती यंत्रणा लेखापरीक्षण हे सल्लागार स्वरूपातील आहे; ज्याचा हेतू यंत्रणेचा वापर करणाऱ्यांना रीतीरिवाज जे संस्थेच्या उद्दीष्टांशी जुळणारे आहेत का नाही याची खात्री करणे.

श्री. बर्कर यांनी माहितीयंत्रणा लेखापरीक्षणाचे पुढील पाच प्रकार मांडले आहेत :

- किंमत किफायतशीर असण्यावर आधारित
- साधनांतील परस्पर संबंधांवर आधारित
- वरील दोन्ही दृष्टीकोन एकत्र असलेले
- व्यवस्थापन माहितीचे लेखापरीक्षण
- कार्याबाबत सल्ला देणारे परीक्षण यात संस्थेची उद्दिष्टे, माहितीच्या मागणीबाबत असणारे नियम आणि प्रमाणके यांचे पालन करून.

विश्लेषणावर आधारित दहा टप्प्यांची माहिती यंत्रणा लेखापरीक्षणाचा एक नमुना श्री. बर्कर यांनी तयार केला आहे. ते दहा टप्पे असे आहेत :

(०१) कार्यपूर्ती उद्दिष्टांची निश्चिती आणि संस्थेतील वातावरणाची सुस्पष्ट कल्पना घेणे.

(०२) उपयोजकांच्या माहितीच्या आवश्यकतेची निश्चिती करणे.

(०३) माहितीच्या साधनांची तपशीलवार यादी / सूची तयार करणे.

(०४) यंत्रणेतील बिघाड आणि नियंत्रणातील मुख्य मुद्दे ओळखणे.

(०५) यंत्रणेतील बिघाडाचे मूल्यांकन करणे.

(०६) नियंत्रण घटकांची चाचणी.

(०७) यंत्रणेतील बिघाडावर पर्यायी उपायांची योजना करणे.

(०८) पर्यायी उपयांचे मूल्यांकन

(०९) उपलब्ध प्रमाणके (मानके) आणि नियमावलीशी यंत्रणेची अनुरूपता पडताळणे.

(१०) लेखापरीक्षणावरील शिफारशी सुचविणे.

माहितीयंत्रणेच्या लेखापरीक्षणात यंत्रणेच्या कार्यपद्धतीचा आढावा घेणे, कार्यपद्धतीचे पृथक्करण, परिणाम आणि अंदाजपत्रिका आढावा, माहिती सेवकांसाठी प्रशिक्षण, विकासासाठी गरजांचे मूल्यनिर्धारण या मुद्यांचा अंतर्भाव होतो. जेव्हा संस्था गुणवत्ता व्यवस्थापनाचा पाठपुरावा करते त्या वेळी गुणवत्ता मार्गदर्शिका आणि त्या संदर्भातील कार्यपद्धती एक मौल्यवान संदर्भस्रोत म्हणून कार्य करताना नवीन मार्ग आणि उत्तरे देऊन एका अनुत्तरीत प्रश्नाची सोडवणूक करतात.

संगणकीय माहिती / अंकीय माहिती व्यवस्थेचे लेखापरीक्षणाने संस्थेस परिणामकारक माहिती संग्रह / साठवण आणि त्याच्या प्रतिप्राप्तीची साधने यांचे मूल्यमापन करण्याचा नियंत्रकाचा मागोवा घेता येतो.

## माहिती यंत्रणेचे नियंत्रक

माहिती यंत्रणेचे नियंत्रक म्हणजे कार्यपद्धती आणि संस्थेचे स्वरूप जे विश्वासार्हतेची हमी देते. या नियंत्रकाच्या सुयोग्य वापराने प्रमाणकांचे पालन आणि विशिष्ट निष्पत्ती मिळण्याची हमी देते. माहितीची विश्वासार्हता साध्य होण्यासाठी नियंत्रकांचा सुयोग्य वापर अनिवार्य आहे. लेखापरीक्षण आणि नियंत्रण कार्यपद्धतीत बदल होऊ शकतो. थोडक्यात, लेखापरीक्षण वारंवार आणि बारकाईने केल्यास नियंत्रण कार्याची जास्तीत जास्त पूर्तता होते. याउलट जितके जास्त नियंत्रण ठेवले जाईल तितके जास्त लेखापरीक्षण किमानतेकडे घटत जाईल. माहिती यंत्रणेच्या नियंत्रणातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सर्वसामान्य स्वीकारार्ह गुणवत्ता प्रमाणक उपलब्ध नाही. नियंत्रणातील परस्परातील संबंधांची माहिती, माहिती यंत्रणेचा आकृतिबंध आणि कार्यपद्धतीच्या परिणामात आढळते. नियंत्रणाची परिणामकारकता ही क्षीण, सर्वसाधारण किंवा जोमदार अशा स्तरावर निश्चित केली जाते. नियंत्रण हे सर्वसाधारण पद्धतीने काम करते ते कामाचे विलगीकरण, अधिकृत परवानगी आणि माहितीची वैधता या मर्यादेतच. मूलभूत नियंत्रण कार्यात प्रतिबंधक, शोधक आणि दोष निवारक हे टप्पे आहेत. यातील शोधक दोष हुडकताना प्रक्रियेवर परिणाम करीत नाही. यंत्रणेतील दोष सापडल्यावर दोष निवारक यंत्रणेची सर्वसाधारण प्रक्रिया सुरू करतो.



उपयोजन नियंत्रकात माहिती भरणे, त्यावर संस्कार करणे, त्याची प्रतिप्राप्ती आणि त्याचे प्रक्षेपण असे टप्पे आहेत. उपयोजनेतील नियंत्रकांनी प्रक्रियेच्या पूर्णत्वाची हमी, यंत्रणेतील एकसंधता, माहितीची अचूकता, अधिकृत आणि विधिग्राह्य माहितीची साठवण, माहितीतील एकात्मता, प्रक्षेपण आणि लेखापरीक्षण याची हमी मिळवली पाहिजे.

## अंकीय ग्रंथालय माहिती व्यवस्थेचे लेखापरीक्षण आणि नियंत्रण

संगणकीय माहिती व्यवस्थेचे लेखापरीक्षण हा एक वाढत्या चिंतेचा प्रश्न आहे. हे कार्य नियमितपणे केले जात आहे ते माहिती तंत्रज्ञान संस्था, ई-बँकिंग, संगणकीय व्यवस्थापन माहिती यंत्रणा, संपर्क केंद्र व्यवस्थापन यंत्रणा, ग्राहक संबंध व्यवस्थापन. अंकीय ग्रंथालय व्यवस्थेचे लेखापरीक्षण आणि नियंत्रणाबद्दलच्या अभ्यासामुळे सध्या उपलब्ध असणाऱ्या ज्ञानाने एक नवी दिशा आणि पुनर्रचना करण्यासाठी वापरले जाईल. अंकीय ग्रंथालयाच्या उद्दिष्टांची पूर्ती होण्यासाठी लेखापरीक्षण करणे गरजेचे आहे. तसेच यामुळे उपलब्ध अशा मौल्यवान माहिती आणि संस्थेच्या स्रोतांचा सुयोग्य व पूर्ण वापर शक्य होईल. यंत्रणेतील बिघाड, अनधिकृत प्रवेश, रचनेच्या मांडणीतील अनधिकृत किंवा अपघाती बदल यांसारखे दोष परिपूर्ण लेखापरीक्षणामुळे तपासता येतील.

## अंकीय ग्रंथालय व्यवस्थेच्या लेखापरीक्षणाचे घटक

अंकीय ग्रंथालय ही गुंतागुंतीची आणि अतिशय प्रगत असे माहिती व्यवस्थेचे एक रूप आहे. यात अनेक घटक आहेत. संगणकीय माहिती व्यवस्थेबरोबरच भौतिक आणि तार्किक घटकांचा यात समावेश आहे. अंकीय ग्रंथालय यंत्रणेत तंत्रज्ञानविषयक आणि संघटनात्मक घटकांचा समावेश आहे. त्यांची विभागणी मानवी, तंत्रज्ञान, संघटनात्मक आणि आर्थिक अशी केली जाते. या वेगवेगळ्या घटकांना स्थान / क्षेत्र / स्थळ म्हणून संबोधतात. उदाहरणार्थ, लेखापरीक्षण आणि नियंत्रण कार्याची तामिली खालील स्थळांच्या कोनातून केली जाते.

## व्यवस्थापकीय व्याप / आवाका

- माहिती यंत्रणेची व्यूहरचना
- कार्यक्षेत्रासंबंधी माहिती यंत्रणा प्रलेखाचे प्रकार व अंतभूर्त विषय
- माहितीची साठवण, प्रक्रियेची साधने आणि व्यवस्थापकीय कार्यपद्धती
- अंकीय ग्रंथालय व्यवस्थेच्या कार्याचे व्यवस्थापकीय नियंत्रण

## तांत्रिक आवाका / व्याप

- संगणक सुरक्षितता
- माहितीची साठवण आणि प्रातिप्राप्ती व्यवस्थेतील प्रक्रिया

- दूरसंचार व्यवस्था आणि जाळी
- प्रचलित उपयोजन
- अंकीय ग्रंथालय व्यवस्था मूल्य

यातील सर्व स्थाने ही पुढे उपस्थानात विभागता येतील. उदाहरणार्थ, संगणक सुरक्षा हे तार्किक आणि भौतिक सुरक्षा अशा दोन उपस्थानांत विभागता येईल.

## लेखापरीक्षण आणि नियंत्रण निकष

अंकीय ग्रंथालयाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी माहिती व्यवस्थेच्या स्थानांनी काही निकष, पुरेसे नियंत्रण उपाय अनुसरले पाहिजेत. निकषांच्या संचासाठी निरनिराळ्या पद्धती, एकमेकांशी साम्य असलेल्या पण अतिव्याप्त (ओव्हरलॅप) विचार केला नाही.

लेखापरीक्षण आणि नियंत्रण निकष खालील तीन मुद्यांत विभागले जातात.

- संस्कारित माहितीच्या प्रतीच्या गुणवत्तेत कार्यक्षमता आणि कृतीचा अंतर्भाव हवा.
- सुरक्षा व्यवस्थेच्या गरजेत सातत्य, सुरक्षा, अनुरूपता आणि विश्वसनीयता या निकषांवर आधारित हवी.
- विश्वसनीयतेच्या गरजेत सुसाध्यता, करणीयता, लेखापरीक्षणीता आणि विकसिततेची क्षमता असणे.

## सारांश

थोडक्यात, अंकीय ग्रंथालयांसाठी सुयोग्य अशा लेखापरीक्षण आणि नियंत्रणाचा नमुना विकसित करण्याची गरज आहे. या नमुन्यात वर चर्चा केलेल्या निकषांचा आणि मर्यादांचा समावेश हवा. सध्या अस्तित्वात असलेल्या अंकीय ग्रंथालयाचे परीक्षण / मूल्यांकन या नमुन्याने करून या नमुन्याची चाचणी करता येईल. अंकीय ग्रंथालयाच्या यशाचे गमक आहे वापरता येण्याजोग्या स्थिर व्यवस्थेचा वापर आणि त्यास प्रवेश. हे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी सुयोग्य आणि परिणामकारक लेखापरीक्षण आणि नियंत्रण नमुना अंकीय ग्रंथालयांनी स्वीकारला पाहिजे. ह्या नमुन्याचा परिसर मर्यादित व मोठ्या प्रमाणातील अंकीय ग्रंथालयांचा परिणामकारक वापर होण्यास मदत होईल. अशा नमुन्याच्या स्वीकारण्यामुळे अंकीय ग्रंथालय व्यवस्था अंकीय माहिती सेवेवर चातुर्याने नियंत्रण ठेवू शकेल.

## संदर्भ


(१) दास (अनुप कुमार) आणि दत्ता (विद्यार्थी), *अॅन इन्ट्रोडक्शन टू ऑडिटिंग अँड कन्ट्रोल ऑफ डिजिटल लायब्ररी सिस्टिम*, ५१, ३, २००४.९९-१०३


❑❑❑



# महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती साक्षरता


डॉ. मोहन खेरडे



*सतत वाढणाऱ्या माहितीचा प्रभावी वापर करता यावा यासाठी माहिती साक्षरता (Information Literacy) आवश्यक असते. सदर लेखामध्ये माहिती साक्षरता म्हणजे काय ते स्पष्ट केले आहे. तसेच माहिती साक्षरतेचे फायदे व माहिती साक्षरता साध्य करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या पद्धतींची माहिती दिलेली आहे.*


मनुष्याच्या जीवनात माहितीला अनन्य साधारण महत्त्व आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात माहितीचे महत्त्व व त्याची उपयुक्तता सर्वांनाच पटलेली आहे. आपल्या क्षेत्रात उच्च शिखर गाठण्याकरिता माहितीची नितांत गरज असते. प्रत्येकाला माहितीची आवश्यकता विविध कारणांकरिता भासत असते.

विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, डॉक्टर, इंजिनीअर, व्यवस्थापकीय क्षेत्रात कार्य करणारी व्यक्ती, व्यावसायिक व इतरही व्यक्तींना त्यांच्या क्षेत्रात कार्य करीत असताना अनेक कारणांकरिता विविध विषयांवर माहिती हवी असते. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाकरिता, शिक्षकांना आपल्या विषयात होणाऱ्या नवीन घडामोडी माहीत करून घेण्याकरिता तसेच विषय शिकविण्याकरिता तर संशोधकांना त्यांच्या संशोधनक्षेत्रातील नव्या संशोधनाची अद्ययावत माहिती मिळवावी लागत असते.

दैनंदिन व्यवहार, विभिन्न क्षेत्रांत घडत असलेल्या निरनिराळ्या घटना, विविध विषयांवर निरंतरपणे सुरू असलेल्या संशोधन प्रक्रिया या माध्यमातून सतत माहितीची निर्मिती होत असते. त्यामुळे जगात विविध विषयांवर प्रचंड माहिती उपलब्ध होत आहे व दर दिवसाला, नव्हे प्रत्येक क्षणाला त्यामध्ये वेगाने भर पडत आहे. आणि ही माहिती विविध प्रकारच्या वाचनसाहित्यामध्ये उपलब्ध होत आहे. यामध्ये पुस्तके, नियतकालिके, शोधप्रबंध यांसारख्या छापील स्वरूपातील तर सीडी रोम, इंटरनेट यांसारख्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्याचा समावेश होत

असतो. या विविध प्रकारच्या वाचनसाहित्यामधून आपणांस हवी असलेली नेमकी माहिती मिळविणे वाचकांकरिता एक आव्हानच ठरले आहे.

शालेय जीवनाचा टप्पा पार पाडून विद्यार्थी जेव्हा महाविद्यालयाच्या वातावरणात प्रवेश घेतात तेव्हा आजच्या स्पर्धात्मक युगात पुढे येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्याकरिता त्यांना गरज असते मार्गदर्शनाची आणि ही जबाबदारी समर्थपणे पेलत असतात महाविद्यालयीन शिक्षक. एखाद्या विषयात किंवा क्षेत्रात आपले करियर बनविण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेत असतात. त्यांना त्यांच्या क्षेत्रातील परिपूर्ण ज्ञान मिळावे या दृष्टीने विद्यापीठ स्तरावर विविध शिक्षणक्रमांचा अभ्यासक्रम निश्चित केला जातो. विविध टप्प्यांवर गरजेनुसार त्यात बदल करून विद्यार्थ्यांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. महाविद्यालयीन शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांना शिकवून त्यांच्यामध्ये ज्ञान रुजविण्याचा व त्यातून एक सुजाण व कृतिशिल नागरिक घडविण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु आजच्या बदलत्या काळात स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर विद्यार्थ्यांना निव्वळ वर्गातील शिक्षण पुरेसे ठरत नाही. त्यासोबत विद्यार्थ्यांमध्ये स्वशिक्षण रुजविणे अत्यंत गरजेचे आहे. याकरिता उच्च शिक्षण ग्रंथालयाभिमुख झाल्यास त्यामध्ये विद्यार्थ्यांचा व पर्यायाने समाजाचा निश्चितच फायदा होईल. याकरिता विद्यार्थ्यांना माहितीच्या दृष्टीने साक्षर करणे ही काळाची गरज ठरली आहे.

## माहिती साक्षरता म्हणजे काय ?

विद्यार्थ्यांना माहितीच्या दृष्टीने साक्षर करणे म्हणजे नेमके काय हा विचार आपणा सर्वांपुढे निश्चितच येईल. व्यक्तिमत्त्व विकासात 'ज्ञान' हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याकरिता विविध विषयांवरील माहितीची नितांत गरज असते. स्वत:ची माहितीची गरज ओळखून माहिती व तिच्या स्रोतांचे मूल्यमापन करून त्यामधून नेमकी माहिती शोधणे, शोध घेतलेल्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करणे, आपल्या उद्दिष्टांची परिपूर्तता करण्याकरिता माहितीचा परिणामकारक उपयोग करणे या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे म्हणजे त्यांना माहितीच्या दृष्टीने साक्षर करणे होय. ही क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याकरिता, उच्च शिक्षण घेत असताना विविध टप्प्यांवर विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची ओळख होणे क्रमप्राप्त ठरते.

## माहिती साक्षरता उपक्रम

मनुष्य आयुष्यभर विद्यार्थी असतो. आपल्या क्षेत्रात प्रगतीचे पाऊल पुढे टाकत असताना त्याला त्या क्षेत्रातील नवीन ज्ञान अवगत करावे लागत असते. त्यासाठी माहिती साक्षरता आवश्यक आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना माहितीचे महत्त्व पटावे, त्यांना स्वत:ला माहिती शोधता यावी म्हणून माहिती साक्षरता अभ्यासक्रम महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या माध्यमातून राबविणे गरजेचे आहे. यामध्ये प्रलेख म्हणजे काय ? त्याचे विविध प्रकार किंवा माहितीचे विभिन्न स्रोत, त्यामधून नेमकी हवी असलेली माहिती मिळविणे, त्याच्या विभिन्न पद्धती, इत्यादी



बाबींचा समावेश व्हावा. याशिवाय आज बहुतांशी ग्रंथालये आधुनिक तंत्रज्ञानाने समृद्ध होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे जगातील कोणतीही माहिती इंटरनेटद्वारे क्षणात आपल्या ग्रंथालयात उपलब्ध होऊ शकते. परंतु याकरीता इंटरनेटचा परिणामकारक उपयोग कसा करावा, त्याद्वारे माहिती शोधण्याच्या अलग अलग पद्धती, विविध विषयावर उपलब्ध असलेल्या वेबसाईटस्, विविध महत्त्वपूर्ण सिडीरोम डेटाबेसेस याबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना ग्रंथालयाद्वारे प्राप्त व्हावी. यापुढे जावून सर्व विद्याशाखांतील सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ई-बुक, ई-जर्नल, डिजीटल ग्रंथालये, व्हर्च्युअल ग्रंथालये या संकल्पना स्पष्ट कराव्यात. शिवाय ग्रंथालय परिचय उपक्रम, ग्रंथालय मार्गदर्शन पुस्तिका ह्यांचादेखील उपयोग केला जाऊ शकतो. परंतु महाविद्यालयातील विद्यार्थिसंख्येचा विचार केल्यास व्याख्यानपद्धती अधिक उपयोगी ठरु शकेल. या बाबींची परिपूर्तता करणे म्हणजे विद्यार्थी खऱ्या अर्थाने माहितीच्या दृष्टीने साक्षर करण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न ठरेल. विद्यार्थ्यांना माहितीच्या बाबतीत साक्षर करण्याची जबाबदारी महाविद्यालयीन ग्रंथपालाने स्वीकारावी.

## माहिती साक्षरता उपक्रम राबविण्याच्या पद्धती

महाविद्यालयीन विद्यार्थी माहितीच्या दृष्टीने साक्षर करताना कोणत्या पद्धती अवलंब करावा ह्याचा विचार होणे आवश्यक आहे. यामध्ये कार्यशाळा, चर्चासत्र ह्यांचे आयोजन करता येऊ शकते.

## माहिती साक्षरता उपक्रमाचे फायदे

प्रत्येक महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती साक्षरता योजनेची व्यवस्थित अंमलबजावणी झाल्यास त्यापासून भविष्यात होणारी निष्पत्ती निश्चितच फायदेशीर असेल. जागतिकीकरणामुळे आज विदेशी विद्यापीठे भारतात आपले बस्तान मांडण्यास उत्सुक आहेत व त्या दिशेने त्यांची वाटचालदेखील पाहावयास मिळत आहे. या विदेशी शिक्षण संस्थांशी यशस्वी स्पर्धा करण्यासाठी आपण घडवीत असलेला विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या सक्षम असणे गरजेचे आहे. या दृष्टीने माहिती साक्षरतेमुळे पुढील फायदे मिळतील.

- ग्रंथालयाशी विद्यार्थ्यांचा सतत संपर्क राहणार असल्यामुळे त्यांच्यामध्ये वाचन-संस्कृती विकसित होण्यास मदत होईल.
- शिक्षण जास्तीत जास्त ग्रंथालयाभिमुख होण्यास मदत होईल.
- स्वत:ची माहितीच्या संदर्भातील गरज ओळखून त्याचा आपले उद्दिष्ट गाठण्यास परिणामकारक उपयोग करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होईल.
- उच्च शिक्षणातील संशोधनात ग्रंथालयाचा अधिक उपयोग होईल. त्यामुळे संशोधनाचा दर्जा उंचावण्यात मदत होईल.

- महाविद्यालयीन ग्रंथालयाचा उपयोग वाढेल व ग्रंथपालांना आपण ग्रंथालयाद्वारे वाचकांना उपयुक्त सेवा देत असल्याचे समाधान लाभेल.

याशिवाय महाविद्यालयीन ग्रंथपालांच्या दृष्टीनेदेखील अनेक फायदे संभवतात. या उपक्रमामुळे महाविद्यालयीन ग्रंथपालांना माहिती साक्षरता उपक्रमासाठी अभ्यासक्रम तयार करण्याच्या, तो अभ्यासक्रम शिकविण्याच्या व विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता तपासण्याच्या प्रक्रियेत सहभाग घेता येऊ शकेल.

## समारोप

शिक्षणाचे जागतिकीकरण होत असताना भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्याचे जे प्रयत्न सर्व स्तरांवरून होत आहेत त्यांमध्ये महाविद्यालयीन ग्रंथालयाचा हा एक छोटासा प्रयत्न ठरेल. महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती साक्षरतेची योजना मांडताना उच्च शिक्षणातील प्रमुख घटक – विद्यापीठ, महाविद्यालय व्यवस्थापन, प्राचार्य व शिक्षक ह्यांचेही मत जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रंथपाल व ग्रंथालयात कार्य करणारे इतर कर्मचारी या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नानेच ह्या योजनेची योग्य रित्या अंमलबजावणी होऊ शकेल.

❑❑❑



# ग्रंथपरिचय

डॉ. सु. प्र. सातारकर / प्रज्ञा भोसेकर /
संजय घुग्रेटकर / मधुकर शेवाळे

❑ **ग्रंथालय व माहितीशास्त्रावरील मराठी ग्रंथांची सूची**
**संकलन :** डॉ. वसंत विष्णू कुलकर्णी
**प्रकाशक :** पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर
**किंमत :** रु. ८०/-, **पृष्ठे :** ६६.

मराठी भाषेतून ग्रंथालयशास्त्रावर अभावानेच लिखाण केले जाते असा समज आहे. ग्रंथालयाशास्त्रातील विविध उपविषयांवर कोणी लिखाण केले आहे व किती पुस्तके उपलब्ध आहेत ही माहिती सहजपणे मिळू शकत नाही. ग्रंथालयशास्त्र भारतात १९३० नंतर विकसित होऊ लागले. मात्र गेल्या २०-२५ वर्षांत या विषयासाठी मराठीतून मोठ्या प्रमाणावर ग्रंथ उपलब्ध होऊ लागले आहेत. या ग्रंथांची उपयुक्त सूची तयार करण्याचे काम संकलकाने केले आहे. या सूचीमध्ये २७७ ग्रंथांची माहिती (ग्रंथवर्णन) देण्यात आली आहे. शिवाय या सूचीची विभागणी चार भागांत केली असून ते विभाग म्हणजे – (१) ग्रंथ, (२) नियतकालिके, (३) चित्रफिती, (४) ग्रंथपालांनी केलेली मराठीतील कोशनिर्मिती हे होत. पहिल्या विभागाचे पुन्हा उपविषयनिहाय २४ विभाग पाडले आहेत.

डॉ. वसंत विष्णू कुलकर्णी नागपूर विद्यापीठाचे निवृत्त ग्रंथपाल म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांची ग्रंथालय व्यवस्थापनाची पुस्तके अनेक वर्षांपासून विद्यार्थी वापरत आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासाठीही त्यांनी लेखन केले आहे. विशेष म्हणजे आज ७७ वर्षांचे वय, मोतीबिंदूचा त्रास असतानाही त्यांनी हे काम पूर्ण केले हे तरुण ग्रंथपालांना प्रोत्साहित करणारे आहे.

प्रस्तुत ग्रंथसूचीची रचना करताना केवळ ग्रंथाचे लेखक, ग्रंथनाम, इत्यादी त्रोटक माहिती न देता त्या ग्रंथातील प्रकरणांची शीर्षके, सर्व आवृत्त्यांचा तपशील दिल्यामुळे ग्रंथसूची अधिक उपयुक्त ठरली आहे. ग्रंथसूचीची रचना विषयनिहाय ठेवल्यामुळे एका विषयावर किती व कोणते ग्रंथ लिहिले गेले आहेत ते सहजपणे कळते.

ग्रंथसूचीच्या प्रस्तावनेत या सूचीचे सांख्यिकीय विश्लेषण केले आहे. ग्रंथालयशास्त्रावर

मराठीतून पहिला ग्रंथ 'ग्रंथालयशास्त्राचा ओनामा' १९३३ मध्ये रघुनाथ शतानंद पारखी यांनी प्रकाशित केल्याचा उल्लेख आहे. ग्रंथालयशास्त्र विषयावर पाच संस्थांनी मराठीतून ग्रंथनिर्मितीचे प्रकल्प राबवले आहेत, त्या संस्था म्हणजे –

(१) महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ;

(२) मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ, औरंगाबाद;

(३) पद्मश्री शि. रा. रंगनाथन स्मारक समिती, पुणे;

(४) महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर;

(५) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

प्रकाशित ग्रंथांपैकी ५८ ग्रंथ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने प्रकाशित केले आहेत. हे ग्रंथ पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता लिहिण्यात आले आहेत.

सर्वाधिक ग्रंथनिर्मितीचा (लेखनाच्या) मान श्री. कृष्ण मुकुंद उजळंबकर यांचेकडे जातो. त्यांनी २६ ग्रंथ लिहिले असून त्यांपैकी ५ अनुवादित आहेत. स्वतंत्र निर्मिती करणारे ४९ ग्रंथपाल लेखक असून सहलेखकांची संख्या ५८ आहे. लेखिकांची संख्या १६ आहे. ७० लेखकांनी केवळ एक ग्रंथ लिहिला आहे. ग्रंथसूचीतील ग्रंथांचे उपविषयनिहाय वर्गीकरण केल्यास असे आढळते की ग्रंथालय आणि समाज या विषयावर सर्वाधिक २७ ग्रंथ लिहिले गेले असून त्याखालोखाल २५ ग्रंथ ग्रंथालय व्यवस्थापन या विषयावर प्रकाशित करण्यात आले आहेत. संशोधन पद्धती व दप्तरखाने या विषयांवर सर्वांत कमी म्हणजे प्रत्येकी तीन ग्रंथ लिहिले गेले आहेत.

ग्रंथालयशास्त्र विषयावर सात मराठी नियतकालिके प्रकाशित करण्यात आली. त्यांपैकी चार बंद पडली असून ग्रंथपरिवार, मासिक ग्रंथालय महासंघ आणि ज्ञानगंगोत्री ही सध्या प्रकाशित होत आहेत. या नियतकालिकांचे पत्ते, वर्गणी, इत्यादी तपशील देण्यात आला आहे. तर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या चार चित्रफितींचादेखील तपशील लेखकाने दिला आहे.

ग्रंथपालांनी केलेल्या कोशनिर्मितीचा महत्त्वाचा तपशील या सूचीमध्ये असून यामध्ये मुख्यत: विविध संदर्भ ग्रंथपालांनी तयार व प्रकाशित केलेल्या विविध विषयांवरील सूचीचा त्यात अंतर्भाव आहे. या विभागात ४७ नोंदी आहेत. या कोशनिर्मितीद्वारे ग्रंथपालांनी इतर विषयांच्या विकासास योगदान दिले असल्याचे दिसते. विशेषत: संदर्भ ग्रंथपालांनी या कामी घेतलेले कष्ट नजरेत भरतात.

मराठी भाषेतून ग्रंथालयशास्त्राचा प्रसार व्हावा या उद्देशाने लिहिलेल्या या ग्रंथांचे पृष्ठसंख्यानिहाय वर्गीकरण करताना असे आढळले की २०१ पेक्षा अधिक पृष्ठसंख्येचे २२; १५१ ते २०० दरम्यान पृष्ठसंख्या असणारे २३; तर १०१ ते १५० पृष्ठसंख्या असणारे ३९ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. इंग्रजी भाषेतून प्रकाशित होणारी ग्रंथालयशास्त्र विषयावरील ग्रंथांची ग्रंथसंख्या पाहता हे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे प्रकर्षाने जाणवते.



ग्रंथालयशास्त्र हा विषय आता प्रमाणपत्र, पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिकविला जात असल्यामुळे या विषयावरील ग्रंथांना विद्यार्थ्यांची मागणी असते. त्यामुळे अधिकाधिक ग्रंथपालांनी लिखाण करण्याची गरज जाणवते.

या ग्रंथसूचीचा उपयोग विद्यापीठांना / शिक्षकांना खूपच होणार आहे. विशिष्ट विषयाकरिता कोणते ग्रंथ उपलब्ध आहेत याचे समग्र ज्ञान होऊ शकते. ग्रंथवर्णनात पुस्तकातील प्रकरणांची नावे दिल्यामुळे आपणास हवी ती माहिती कोणत्या पुस्तकात मिळेल ते समजू शकते. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास ग्रंथालयशास्त्रातील साहित्यविश्वाची कल्पना या सूचीवरून येईल.

ही सूची अगदी परिपूर्ण आहे असे म्हणणे धाडसाचे ठरेल. सर्वच ग्रंथ समाविष्ट नसतील; कारण आज प्रकाशनव्यवसाय लहान शहरातही स्थिरावला आहे. तथापि पुढील आवृत्तीद्वारे अशी वगळलेली पुस्तके समाविष्ट करता येतील. प्रस्तुत ग्रंथसूचीमुळे लेखकही ही माहिती पाठवीतील.

एकूण या सूचीचे स्वागत वाचक / विद्यार्थी / शिक्षक निश्चितच करतील असा विश्वास वाटतो.

---

❑ **Setting up a library and information service from scratch**
**Author :** Sheila Pantry and Peter Griffiths,
**Publisher :** London, Facet Publishing, 2005,
**Price :** Rs. 3000/-

## ग्रंथालय आणि माहिती केंद्र नव्यानेच स्थापन करण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शक

औपचारिक शिक्षणसंस्थांमध्ये ग्रंथालय आणि माहिती केंद्र स्थापन करणे अनिवार्य असते. परंतु निरनिराळ्या प्रकारच्या खाजगी व व्यापारी संस्था, कार्यालये, सामाजिक संस्था यांच्याकडे ग्रंथालय आणि माहिती केंद्र असतेच असे नाही. या संस्था ग्रंथालयाशिवायही कार्यरत असतात, नुसत्याच कार्यरत असतात असे नाही तर प्रगतीही करतात.

परंतु अशा संस्थांमध्ये जर ग्रंथालय व माहिती केंद्र स्थापन केले तर त्या संस्थेला काय फायदे होतील याची सविस्तर चर्चा सदर ग्रंथात केली आहे.

या ग्रंथाच्या लेखकांना विविध विषयांशी संबंधित ग्रंथालये व माहिती केंद्रे स्थापन करून देण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी ब्रिटन आणि इतर पाश्चिमात्य देशांमध्ये ग्रंथालये व माहिती केंद्रे स्थापन करून दिली आहेत.

ग्रंथालय व माहिती केंद्र नव्यानेच स्थापन करून ते कार्यरत ठेवणे हे एक कौशल्यपूर्ण कार्य

आहे. हे कार्य परिणामकारकपणे पार पाडता यावे या अनुषंगाने सदर ग्रंथामध्ये उपयुक्त असे मार्गदर्शन मिळते.

ग्रंथालय व माहितीकेंद्र का स्थापन करावे याची माहिती ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात दिली आहे. ग्रंथालय व माहितीकेंद्रामुळे पालक संस्थेला काय फायदे मिळतात याचे विवेचन याच प्रकरणात केले आहे. ग्रंथालय व माहितीकेंद्राच्या फायद्याचे विवेचन करताना माहिती म्हणजे काय, अधिकृत आणि उपयुक्त माहिती कशी ओळखावी, माहिती कोणाला आवश्यक असते, पालक संस्थेला आवश्यक असलेली सर्वच माहिती इंटरनेटवर असते काय ? व ती माहिती मोफत असते काय अशा प्रश्नांच्या उत्तरांद्वारे लेखकांनी ग्रंथालय व माहिती केंद्राच्या निर्मितीची आवश्यकता स्पष्ट केली आहे.

उपभोक्त्यांच्या माहितीच्या गरजा जाणून घेणे तसेच त्यांचा विश्वास संपादन करण्यासंबंधीचे मार्गदर्शन प्रकरण दोनमध्ये केलेले आहे. नव्याने स्थापन केलेले ग्रंथालय व माहिती केंद्र परिणामकारकपणे चालविण्यासाठी कशा प्रकारचे व किती सेवक नेमावेत, त्यांचे किमान वेतन किती असावे, त्यांना प्रशिक्षण देऊन कार्यक्षम मनुष्यबळाचा संघ कसा निर्माण करावा, हे प्रकरण चारमध्ये सांगितलेले आहे.

कोणतेही ग्रंथालय व माहिती केंद्र स्वयंपूर्ण नसते या बाबीचे भान ठेवून प्रकरण पाचमध्ये नेटवर्कची चर्चा केली आहे. त्यामध्ये नेटवर्क म्हणजे काय, ते सांगून स्थानिक, विभागीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय माहिती साधनांची चर्चा केलेली आहे. तसेच विषयाधारित मुद्रित आणि मुद्रणेतर माहिती साधनांची चर्चाही याच प्रकरणात केलेली आहे.

ज्या संस्थेमध्ये / संस्थेसाठी ग्रंथालय व माहितीकेंद्र स्थापन केले आहे त्या संस्थेची माहितीची गरज विचारात घेऊन ग्रंथालयाने कोणती कार्ये करावीत व कोणत्या सेवा द्याव्यात याची चर्चा प्रकरण सहामध्ये केलेली आहे. स्थापन केलेले ग्रंथालय कार्यरत राहण्यासाठी लागणाऱ्या साहाय्यभूत सेवांचे वर्णन प्रकरण सातमध्ये केले आहे. यामध्ये व्यवस्थापकीय, आर्थिक, संघटनात्मक, तांत्रिक, नेटवर्क, इत्यादी साहाय्यभूत कार्यांचे वर्णन आहे.

नव्याने स्थापन केलेल्या ग्रंथालय व माहिती केंद्राचा जास्तीत जास्त उपयोग केला जावा यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रसिद्धी कार्यक्रमाची / उपक्रमांची रूपरेषा प्रकरण आठमध्ये स्पष्ट केली आहे. यामध्ये जाहिरात, वार्तापत्र, लेख लिहिणे, परिषदा व चर्चासत्रांमधून प्रसिद्धी करणे, प्रकाशने, वेबसाईट, इत्यादी साधनांचा / मार्गांचा वापर कसा करावा याची माहिती प्रकरण सातमध्ये दिली आहे.

ग्रंथालय व माहिती केंद्राचा विकास होण्यासाठी नवनवीन उपभोक्ते मिळविणे, उपभोक्त्यांना त्यांची माहितीची गरज जाणवून देणे आवश्यक असते. संभाव्य उपभोक्त्यांचा शोध घेऊन त्यांना ग्रंथालय व माहिती केंद्राचा वापर करण्यासंबंधीचे प्रशिक्षण देणे आवश्यक असते. अशा संभाव्य उपभोक्त्यांचे प्रकार आणि त्यांना कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण द्यावे याबाबतची माहिती प्रकरण आठ मध्ये दिली आहे. उपभोक्ता प्रशिक्षण उपक्रम कसा राबवावा याचीही माहिती याच प्रकरणात दिली आहे.



ग्रंथाच्या यानंतरच्या भागामध्ये पारिभाषिक शब्दांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. प्रकरणानुसार संदर्भसूची दिलेली आहे. संदर्भसूचीमध्ये मुद्रित वाचनसाहित्याबरोबर डिस्कशन ग्रुप्स व वेबसाईट्सचाही समावेश आहे.

ग्रंथाच्या शेवटच्या भागामध्ये कॉपीराईट जाहीरनामा फॉर्म, काही मूलभूत संदर्भग्रंथांची यादी, वार्तांकनाचा नमुना, ग्रंथालयाच्या माहितीपुस्तिकेचा नमुना, ग्रंथ व नियतकालिक वितरकांची यादी आणि ग्रंथालयांशी संबंधित इतर मूलभूत बाबी स्पष्ट करणारी परिशिष्टे आहेत.

ग्रंथाची छपाई सुबक आहे. अक्षरांचा आकार वाचनीय आहे. ग्रंथाची बांधणी मजबूत आहे.

सदर ग्रंथ ग्रंथपालन क्षेत्रात नव्यानेच प्रवेश करणाऱ्यांना विशेष करून उपयुक्त ठरेल.

---

## ❑ कहाणी इंग्लिश ऑक्सफर्ड डिक्शनरीची

**लेखक :** प्रतिभा टिल्लू
**प्रकाशक :** नाना जोशी, मुंबई
**किंमत :** रु. २२५/-

घरात असणाऱ्या नेहमीच्या अन्य गरजेच्या वस्तूंएवढी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी. पण याची निर्मिती कशी झाली असावी असे कुतूहल लेखिकेला निर्माण झाले. कारण तिच्या हातात पडलेल्या Caught in the web of words या एलिझाबेथ मूरे ह्यांनी लिहिलेल्या चरित्रामुळे.

'न्यू इंग्लिश डिक्शनरी' या नावाने प्रसिद्ध झालेल्या अठ्ठावीस खंडांच्या शब्दाकोशाची ही कहाणी. 'कहाणी ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीची' लेखिका सौ. प्रतिभा टिल्लू. या डिक्शनरीचे दोन नायक डॉ. जेम्स मूरे, डॉ. विल्यम मिनोर. डॉ. मूरे यांना अजून दोन मित्र मिळाले ते प्रा. एलीस, प्रा. स्वीट.

शेक्सपियर जेव्हा नाटक लिहीत असे तेव्हा त्याने वापरलेल्या शब्दांसाठी संदर्भग्रंथ नव्हते. १६९२ मध्ये ऑक्सफर्डचा एक इतिहासकार ॲटनीवूड याला शब्दकोशाची कल्पना सुचली. नवीन नवीन शब्दकोश त्यात येऊ लागले; पण संथ गतीने. पुढे शंभर वर्षे भरपूर प्रमाणात कोश बाजारात आले. डॉ. जॉन्सन हे नाव या क्षेत्रात पुढे आले, नंतर जेम्स मूरे.

कोशातला पहिला शब्द aa, दुसरा aal असे करत ant पर्यंत गाडी पोहोचली. ३१ डिसेंबर १९२७ रोजी डिक्शनरी पूर्ण झाली. इथे पहिले प्रकरण संपते. दुसऱ्या प्रकरणात जॉन मूरे यांची जीवनकहाणी आहे. हे वाचताना त्यांच्या शिस्तबद्ध आयुष्याबाबत कौतुक वाटते.

तिसऱ्या प्रकरणात डॉ. मिनोरची गोष्ट. वेड्याच्या हॉस्पिटलमध्ये असणारा डॉ. मिनोर शेवटी हॉस्पिटललाच घर मानू लागला. प्रत्येक वेळी एखादा शब्द नजरेत भरला की ताबडतोब तयार केलेल्या पुस्तिके योग्य जागी बारीक अक्षरात नोंदवून ठेवत असे. म्हणता म्हणता मोठी

यादी तयार झाली. डॉ. मिनोर हे 'ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीचे' मदतनीस असूनही समाजात दुर्लक्षित राहिले.

शेवटचे प्रकरण वेबस्टर डिक्शनरीची जन्मकथा आहे. उत्तम मराठीत ओघवत्या भाषेत लिहिलेले पुस्तक मनात घर करत सहज मनात येतं संगणकाच्या मदतीशिवाय इतकं मोठ काम होऊ शकते, तर आजच्या काळात सर्व सुविधा उपलब्ध असताना आमच्यासारख्या ग्रंथपालांच्या हातून संदर्भसाहित्याची निर्मिती का होऊ नये ? असं वारंवार मनात येतं हेच या पुस्तकाचे यश आहे.

---

## ❑ विश्व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांचे

**लेखक :** प्रा. सी. श्री. पाटील

**प्रकाशन :** स्नेहल एजन्सीज, ११०४ विठाई, नलावडे कॉम्प्लेक्स, देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग

**मूल्य** रु. २००/-, **पृष्ठे** २४०.

आपल्या भारत देशाला प्राचीन काळापासूनच समृद्ध ज्ञानाचा व संस्कृतीचा संपन्न वारसा लाभलेला आहे. अयोध्या, काशी, कांची, उदंतपुरी, गुणशीला, तक्षशीला, नालंदा अशी प्राचीन विद्यापीठे अस्तित्वात होती. तेथे हिंदू, जैन, बौद्ध धर्माचार्यांच्या हस्तलिखितांचे भांडार होते. अशाच प्रकारचा खजिना आपल्या महाराष्ट्रात मराठीतही उपलब्ध होता. त्यामुळे मराठी भाषा जेव्हापासून लिहिली गेली, तेव्हापासून मराठीत ज्ञानसाहित्य जपण्यास सुरुवात झाली. ग्रंथालयेही वेगवेगळ्या स्वरूपात तत्कालीन काळात अस्तित्वात आली. पेशवाईत तर शाहूंच्या काळात पुस्तकशाळाच अस्तित्वात आली. तेव्हापासून आजपर्यंत ग्रंथालयाचा इतिहास पाहता महाराष्ट्र राज्य ग्रंथालयक्षेत्रात अग्रेसर आहे.

आज महाराष्ट्रात ग्रंथालयांची वाटचाल जोमाने सुरू असून शहरापासून ग्रामीण भागापर्यंत सर्वत्र सार्वजनिक ग्रंथालये सुरू करण्यात आली आहेत. या ग्रंथालयांचे एक वेगळे विश्व निर्माण झाले आहे, अशा या विश्वाची इत्थंभूत माहिती देणारा 'विश्व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांचे' हा मार्गदर्शक ग्रंथ देवगड येथील स. ह. केळकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. सी. श्री. पाटील यांनी लिहिला आहे.

प्रस्तुत ग्रंथात लेखकांने पहिल्या 'सार्वजनिक ग्रंथालये' या प्रकरणात सार्वजनिक ग्रंथालयाबद्दल साध्या सोप्या भाषेत विश्लेषण केले आहे. ते म्हणतात, 'सार्वजनिक ग्रंथालय ही शिक्षण, संस्कृती आणि माहिती देणारी लोकशाहीवादी समाजोपयोगी संस्था आहे. मानवाचे विचार, त्याच्या कल्पना आणि त्याने स्वत:च्या प्रतिभेने निर्माण केलेल्या साहित्याचे अशा ग्रंथालयात उपार्जन करून जतन केले जाते व ते जनतेला उपलब्ध करून दिले जाते'. अशी इतरांहून वेगळी पण समर्पक अशी व्याख्या या ग्रंथात असून सार्वजनिक ग्रंथालयाचे वैशिष्ट्य,



उद्दिष्टे, कार्ये यांची माहिती दिली आहे. त्याबरोबर आजपर्यंत दहा राज्यांत ग्रंथालय कायदा अस्तित्वात आहे, याचीही थोडक्यात माहिती दिली आहे.

सार्वजनिक ग्रंथालये कशी सुरू करावीत, अस्तित्वात असलेली ग्रंथालये कशी चालवावीत, वाचकवर्ग कसा मिळवावा, त्यांच्या आवडनिवडीचा अभ्यास कसा करावा, निधी कसा उभारावा, शासनाच्या कोणत्या योजना आहेत, त्याचा ग्रंथालयाला लाभ कसा करून घ्यावा, राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानकडून वेगवेगळ्या योजनांद्वारा अनुदान कसे मिळवावे अशा अनेक महत्त्वपूर्ण मुद्यांवर 'सार्वजनिक ग्रंथालये – अशी काढावीत, अशी वाढवावीत' या प्रकरणात मार्गदर्शन करण्यात आले आहे. खास करून या प्रकरणातील माहिती ग्रामीण पातळीवर ग्रंथालय सुरू करताना खूपच उपयुक्त ठरते. ग्रंथालयाचा दर्जा ठरवण्यासाठी किंवा नवे ग्रंथालय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या सर्व कागदपत्रांची यादीच या प्रकरणात लेखकाने दिली असून कोणत्या वर्गासाठी किती अनुदान मिळते, इतर अनुदान कसे मिळवावे याविषयी सूचना केल्या आहेत.

ग्रंथालय म्हणजे फक्त पुस्तकांची देवघेव करणे, असा सर्वसामान्यांचा समज असतो. परंतु ग्रंथालयाची योग्य दिशेने वाटचाल सुरू ठेवण्यासाठी व्यवस्थापन हा घटक महत्त्वाचा ठरतो. या घटकाविषयीही खास प्रकरणात माहिती दिली आहे. ग्रंथनिवड, ग्रंथखरेदी, ग्रंथनिवडीची साधने, ग्रंथनिवड समिती, ग्रंथोपार्जन विभागातील कामे, दाखल नोंद वही, ग्रंथ वर्गीकरण व त्याचे फायदे, वर्गीकरणाच्या पद्धतीनुसार महत्त्वाच्या विषयांचे वर्गीकरण तक्ते, तालिकेचा हेतू व प्रकार, देवघेव पद्धती, संदर्भसेवा, संगणकीकृत देवघेव पद्धत, संदर्भग्रंथाचे प्रकार, ग्रंथबांधणी, ग्रंथाची निगा, ग्रंथालय इमारत अशा आवश्यक घटकांविषयी माहिती दिली आहे.

ग्रंथालयातील ज्ञानसाहित्याची नियमित पडताळणी व आर्थिक व्यवहार या घटकाचीही लेखकाने माहिती दिली आहे. या माहितीचा उपयोग ग्रंथपालांना वार्षिक अहवाल तयार करताना निश्चित होतो.

संपूर्ण महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय विश्वाबद्दल माहिती देताना लेखकाने महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीचा इतिहास एका प्रकरणात दिला आहे. प्राचीन काळ (सुरुवातीपासून ते १२००), मध्ययुगीन काळ (१२०० ते १४००), अव्वल ब्रिटिश अंमलाचा काळ (१८०४ ते १९२१), अर्वाचीन काळ (१९२१ ते १९६०), सद्यकाळ (१९६० ते आजतागायत) अशा पाच विभागांत या कालखंडाची विभागणी करून प्रत्येक कालखंडातील ग्रंथालयाची स्थिती कशी होती, वाढ कशी होत आली याविषयी ऐतिहासिक माहिती दिली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायद्याची ओळख व कायद्यातील तरतुदीची माहिती सर्वसामान्य वाचकांना समजेल अशा सोप्या भाषेत लेखकाने दिली आहे. या कायद्याची आवश्यकता, कायद्यानुसार सेवक वर्ग, त्यांची पदे व वेतनश्रेणी दर्शविणारा तक्ता, मध्यवर्ती ग्रंथालय, राज्य ग्रंथालय परिषद, नियम याबद्दल माहिती देतानाच या कायद्यामधील काही उणिवाही लेखकाने निर्भीडपणे मांडल्या आहेत. त्यावर सरकारने विचार करणे गरजेचे आहे.

चौथ्या पंचवार्षिक योजनेत ग्रंथालयांना अनुदान देण्यासाठी राजा राममोहन रॉय ग्रंथालय

प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली. त्यानुसार ग्रंथालयांना अर्थसाहाय्य केले जाते. ही योजना नेमकी कशी आहे, या विषयी 'राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान' या प्रकरणात माहिती दिली आहे.

सार्वजनिक ग्रंथालयात लागणाऱ्या नोंदवह्या, त्यांचे आराखडे यांची माहिती असून महाराष्ट्रातील शासकीय व शताब्दी पूर्ण केलेली ग्रंथालये यांची इत्थंभूत माहिती फक्त याच ग्रंथात सापडते. त्याबरोबरच सार्वजनिक ग्रंथालय सुरू करण्यापासून ते पुढे ग्रंथालयासाठी विविध अनुदान योजना, विविध मागण्या, परिसंवाद, प्रशिक्षण वर्ग, इमारत अनुदान, साधनसामग्री अनुदान व इतर बाबतींत मागणी करताना लागणाऱ्या अर्जांचे नमुने परिशिष्ट १ ते १७ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.

ग्रंथमांडणी नियोजनबद्ध असल्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयात काम करणाऱ्यांना प्रस्तुत ग्रंथ उपयुक्त आहे. प्रा. पाटील यांच्या २९ वर्षांच्या प्रदीर्घ अशा ग्रंथालयीन वाटचालीतील अनुभवातून हा ग्रंथ तयार झाला आहे. प्रत्येक प्रकरणात नेमकेपणाने केलेले विवेचन हे डोळसपणे केलेल्या अभ्यासातून उतरले आहेत. कारण लेखक स्वत: ग्रंथपाल असून गेली अनेक वर्षे ते ग्रंथालयशास्त्राच्या पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या या ग्रंथाला एक वेगळे मोल असून हा ग्रंथ ग्रंथपालांबरोबरच विद्यापीठस्तरावर ग्रंथालयशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनं उपयोगी आहे.

---

❑ **Managing Outsourcing in Library and Information Services.**

**Authors :** Pantry, Sheila and Griffiths, Peter

**Publisher :** London, Facet Publishing

ISBN 1 - 85604-543-9

## ग्रंथालय कार्यांच्या आऊटसोर्सिंगचे व्यवस्थापन

कॉंट्रक्ट पद्धतीने संस्थेबाहेरील एजन्सीकडून कामे करवून घेणे हा एक नवीन प्रघात प्रायव्हटायझेशन आणि जागतिकीकरणाच्या युगात आला आहे. विशेषत: औद्योगिक क्षेत्रात अशा पद्धतीने मोठ्या प्रमाणावर कार्य चालते. ग्रंथालय आणि माहितीसेवेच्या क्षेत्रातही अशा प्रकारचे कार्य अलीकडे करून घेण्यात येऊ लागले आहे. 'आऊटसोर्सिंग' असे गोंडस नाव त्याला देण्यात आले आहे. ही संकल्पना नवी असली तरी विसाव्या शतकाच्या अगदी सुरुवातीपासून (१९०२) लायब्ररी ऑफ कॉंग्रेसने ५ X ३ इंच आकाराची तालिकापत्रे (Duplicate copies) तयार करून जगभरातील ग्रंथालयांना विकली आहेत. ही तालिकापत्रे खरेदी करणाऱ्या ग्रंथालयाच्या दृष्टीने हासुद्धा आऊटसोर्सिंगचा भाग आहे. ग्रंथालयात साधारणपणे दोन स्वरूपाचे कार्य असते. एक म्हणजे वाचनसाहित्यावर करावयाचे सोपस्कार (Work behind scene) आणि दुसरे म्हणजे वाचकांबरोबरचे व्यवहार (Work with the readers). या दोन्ही प्रकारांत काही भाग असा असतो की तो आऊटसोर्स केल्यामुळे कमी पैशात जास्त काम व तेही जलदगतीने करून घेणे शक्य असते. विशेषत: संगणकीकरणाच्या युगात डेटाबेसची निर्मिती करणे, ऑनलाईन ॲक्सेस, वेबसाईटची निर्मिती करणे, वर्गीकरण तसेच स्वच्छता, इत्यादीसाठी आऊटसोर्सिंगचे पर्याय उपलब्ध असतात.

प्रस्तुत पुस्तक हे १२ प्रकरणांमध्ये विभागण्यात आले आहे. पहिल्या प्रकरणात आऊटसोर्सिंग म्हणजे काय ? आऊटसोर्सिंगचे फायदे-तोटे, नेमक्या कोणत्या बाबी आऊटसोर्स करावयाच्या आहेत तसेच ग्रंथालय सेवांमधील परिणामकारकता विशद करण्यात आली आहे. दुसऱ्या प्रकरणात आऊटसोर्सिंग करण्यासाठी संस्थेची नेमकी गरज ओळखून संस्थाअंतर्गत ज्या बाबी / सेवा / प्रकिया होणे शक्य आहे त्या व उर्वरित बाबींची माहिती तयार करून (Information Audit) त्याचे सादरीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे नेमक्या कोणत्या कार्यांचे आऊटसोर्सिंग करावे हे लक्षात येते.

तिसऱ्या प्रकरणात आऊटसोर्सिंग केव्हा करावे, त्याकरिता इन्फरमेशन ऑडिटद्वारे मिळालेले निष्कर्ष उपयोगात घेऊन कोणत्या सेवा देता येतील तसेच विभागनिहाय कोणकोणती कार्ये करता येतील ही माहिती दिली आहे. चौथ्या प्रकरणात माहितीच्या मालकीबद्दल चर्चा करण्यात आली आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मोठ्या प्रमाणात माहितीची उपलब्धी झाली असून माहितीच्या मालकीबद्दल संभ्रम निर्माण होतो. या प्रकरणात व्यष्टी अभ्यासाद्वारे माहितीची मालकी आणि हक्क याबाबतचे विवेचन दिले आहे. पाचव्या प्रकरणात आऊटसोर्सिंगचे स्वरूप, लागणारा वेळ, सेवाशर्ती, सामंजस्य करार याबाबतची माहिती दिली आहे. पुढील प्रकरणात करार म्हणजे काय, कराराची उद्दिष्टे, करारामध्ये नमूद करावयाच्या बाबी, कोणत्या बाबी असू नयेत, कराराची अंमलबजावणी यांचा समावेश आहे. त्यानंतर आऊटसोर्सिंगचे घटक, त्यांची रचना, सेवांमधील सातत्य, लोकांचा सहभाग, या सेवेद्वारे वाचकांना आनंदी ठेवता येईल अशा बाबी, वाचक-सेवक आणि आऊटसोर्सिंग कार्यक्रम यामधील संप्रेषण व समन्वय याबाबतची माहिती दिली आहे.

भारतामध्ये सध्या सर्वच महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय ग्रंथालयांमध्ये आधुनिकीकरणाचे काम चालू आहे. नवनवीन तंत्रज्ञान येऊ घातले आहे. हे सर्वच कार्य उपलब्ध सेवकांमध्ये होणे अवघड आहे. तसेच माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांची उपलब्धी प्रत्येक ग्रंथालयास आवश्यक असतेच. त्या दृष्टिकोनातून आऊटसोर्सिंग हा पर्याय चांगला आहे. प्रस्तुत पुस्तकासाठी प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्र संदर्भसूची देण्यात आली असून निर्देशही दिलेला आहे.

❑❑❑

# आपले लोकप्रतिनिधी आणि ग्रंथालये

जयानंद मठकर

*लोकप्रतिनिधींना सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासामध्ये उपयुक्त असे योगदान देणे शक्यआहे. परंतु त्यांच्या उदासीनतेमुळे महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांचा योग्य असा विकास झालेला नाही हे या लेखात स्पष्ट केले आहे.*

१९६० साली मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र हे भारतातील एक पुरोगामी आणि प्रगतिशील राज्य मानले गेले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामोन्नतीची गाव तेथे शाळा, गाव तेथे ग्रामपंचायत, गाव तेथे सहकारी संस्था आणि गाव तेथे ग्रंथालय ही सर्वमान्य उद्दिष्टे ठरली गेली. या उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने पुरोगामी आणि प्रगतिशील मानल्या गेलेल्या महाराष्ट्र राज्याची केवढी वाटचाल झाली आहे याचा आढावा घेतला असता काय दृश्य दिसते? गाव तेथे शाळा हे उद्दिष्ट जवळजवळ शंभर टक्के साध्य झाले आहे. गाव तेथे ग्रामपंचायत आणि गाव येथे सहकारी संस्था या उद्दिष्टांच्या बाबतीतही इतर राज्यांशी तुलना करता महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. पण गाव तेथे ग्रंथालय या उद्दिष्टाप्रत पोहोचण्यासाठी महाराष्ट्र राज्याला अद्यापि बरीच मोठी वाटचाल करावयाची आहे, हे उपलब्ध आकडेवारीवरून दिसून येते.

महाराष्ट्र राज्यात ग्रंथालयासाठी शासनाचे स्वतंत्र संचालनालय असून हे संचालनालय प्रतिवर्षी आपला अहवाल सादर करीत असते. ग्रंथालय संचालनालयाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार आज महाराष्ट्र राज्यात शासनमान्य साडेसात हजार ग्रंथालये असून त्यातील सुमारे दीड हजाराहून अधिक ग्रामपंचायती आहेत. ग्रंथालय संचालनालयाने राज्यात जी साडेसात हजार ग्रंथालये असल्याचे नमूद केले आहे त्यातील बंद असलेली व वाचकांना किमान ग्रंथालयीन सेवा पुरवू न शकणारी 'ड' वर्गातील ग्रंथालये वगळता किमान ग्रंथालयीन सेवा देणारी ग्रंथालये या राज्यात पाच हजारांहून अधिक नसावीत हे वास्तव विचारात घेता पुरोगामी आणि प्रगतिशील मानल्या गेलेल्या या राज्यात 'गाव तेथे ग्रंथालय' हे उद्दिष्ट दहा-बारा टक्केच साध्य झाले आहे, हे सत्य नाकारता येणार नाही.

महाराष्ट्र राज्यात ग्रंथालयांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्रंथालयांच्या नियमनासाठी १९६७ साली ग्रंथालय कायदा महाराष्ट्र विधिमंडळाने मंजूर केला आहे. या कायद्याने ग्रंथालयांना मान्यता देण्यासाठी आणि अनुदान देण्यासाठी अ, ब, क आणि ड अशी वर्गवारी केली आहे.



कायदा मंजूर केल्यावर या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नियमही तयार करण्यात आले आहे. या नियमानुसार वर्गवारीप्रमाणे वार्षिक अनुदानाचे सुरुवातीचे सूत्र 'ड' वर्गीय ग्रंथालयांना वार्षिक दोन हजार रुपये, क वर्गातील ग्रंथालयांना वार्षिक आठ हजार रुपये, ब वर्गातील ग्रंथालयांना वार्षिक सोळा हजार रुपये आणि अ वर्गातील ग्रंथालयांना वार्षिक बत्तीस हजार रुपये याप्रमाणे ठरविण्यात आले होते. या अनुदानात वाढ करण्यासाठी राज्य ग्रंथालय संघ, ग्रंथालय कर्मचारी संघटना आणि ग्रंथालयीन कार्यकर्त्यांनी वेळोवेळी सनदशीर मार्गाने केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन अनुदानात तीन वेळा शंभर टक्के वाढ केली आहे. सध्या महाराष्ट्र राज्यात ड वर्गातील ग्रंथालयांना वार्षिक वीस हजार (रु. २०,०००/-), क वर्गातील ग्रंथालयांना वार्षिक चौसष्ट हजार रुपये (रु. ६४,०००/-), ब वर्गातील ग्रंथालयांना वार्षिक एक लक्ष अठ्ठावीस हजार (रु. १,२८,०००/-) आणि अ वर्गातील ग्रंथालयांना दोन लक्ष छप्पन हजार (रु. २,५६,०००/-) याप्रमाणे अनुदान दिले जाते.

## लोकप्रतिनिधींची उदासीनता

महाराष्ट्र शासनाची ग्रंथालयाबाबतची भूमिका सहानुभूतीची असली तरी महाराष्ट्र राज्यात ग्रंथालयांचा विस्तार आणि विकास अत्यंत मंदगतीने होण्यामागे जी अनेक कारणे आहेत त्यातील या राज्यातील लोकप्रतिनिधींची विशेषत: विधानसभा सदस्य (आमदार) आणि लोकसभा सदस्य (खासदार) यांची ग्रंथालयाबाबतची पराकोटीची उदासीनता हे प्रमुख कारण आहे. सर्व लोकप्रतिनिधींनी जर मनात आणले तर पुरोगामी आणि प्रगतिशील मानल्या गेलेल्या महाराष्ट्र राज्यात 'गाव तेथे ग्रंथालय' हे उद्दिष्ट साध्य करणे नजीकच्या काळात अवघड होणार नाही. पण ग्रंथालयाबाबत आपले हक्क काय आहेत ? ग्रंथालयाबाबतची आपली कर्तव्ये काय आहेत ? आणि ग्रंथालयांना आपण कशी मदत करू शकतो ? याबाबत बहुसंख्य लोकप्रतिनिधी अद्यापही अनभिज्ञ दिसतात. लोकप्रतिनिधींची ग्रंथालयांबाबतची उदासीनता आणि अनभिज्ञता यामागील प्रमुख कारण म्हणजे 'ग्रंथालये' आमच्या लोकप्रतिनिधींना मते मिळविण्याची साधने (व्होट बँका) वाटत नाही हे असावे, असे माझे अवलोकन आहे. या संदर्भात पुढील वास्तव विचारात घेतले असता माझे हे अवलोकन वावगे अगर चुकीचे नाही हे मान्य करावे लागेल.

## जिल्हा नियोजन मंडळाकडून उपेक्षा

जिल्ह्यात सुरू होणाऱ्या नवीन ग्रंथलयांना अनुदानप्राप्तीसाठी जिल्ह्याच्या नियोजन व विकास मंडळाने जिल्ह्याच्या वार्षिक नियोजनात प्रतिवर्षी आर्थिक तरतूद करणे अनिवार्य असते. खासदार आणि आमदार जिल्हा नियोजन मंडळाचे पदसिद्ध सभासद असतात; पण अनुभव असा आहे की, कुठल्याही जिल्ह्याचे नियोजन व विकास मंडळ जिल्ह्याच्या वार्षिक नियोजनात ग्रंथालयासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करीत नाही. जिल्ह्याच्या वार्षिक नियोजनाचा जो आराखडा असतो त्यात ग्रंथालयासाठी करावी लागणारी तरतूद अगदी नगण्य स्वरूपाची असते. पण कुठल्याही जिल्ह्यात ग्रंथालयांची गरज विचारात घेऊन जिल्ह्याच्या वार्षिक नियोजनात ग्रंथालयासाठी

पुरेशी आर्थिक तरतूद केली जात नसल्याने आज महाराष्ट्र राज्यात तीन हजारांहून अधिक ग्रंथालये शासकीय मान्यतेच्या व अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. लोकप्रतिनिधींचे मतदार संघातील काम मतदारापर्यंत पोहोचविण्याचे कार्य ग्रंथालयेच करीत असतात. हे वास्तव विचारात घेऊन ग्रंथालयासाठी गरजेप्रमाणे जिल्ह्याच्या वार्षिक नियोजनात तरतूद करणे हे लोकप्रतिनिधींचे आद्य कर्तव्य ठरते. या कर्तव्याची पुरेशी जाण आमच्या लोकप्रतिनिधींना (आमदार / खासदार) नाही असे अत्यंत खेदाने नमूद करावे लागत आहे. परिणामी जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून ग्रंथालयांची उपेक्षा होत आहे.

## राज्य ग्रंथालय परिषद सहा वर्षे पुनर्रचनेच्या प्रतीक्षेत

महाराष्ट्र राज्याच्या ग्रंथालय कायद्यामध्ये राज्य ग्रंथालय परिषदेच्या निर्मितीची तरतूद आहे. शिक्षणमंत्री ग्रंथालय परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात, तर शिक्षण राज्यमंत्री पदसिद्ध उपाध्यक्ष असतात. राज्य ग्रंथालय संचालक हे परिषदेचे पदसिद्ध सचिव असतात. याशिवाय विधानसभा, विधानपरिषद, जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, महानगरपालिका आणि राज्य व विभागीय ग्रंथालय संघाच्या प्रतिनिधींना ग्रंथालय परिषदेवर पुरेसे प्रतिनिधित्व दिले गेले आहे. राज्य ग्रंथालय परिषदेचे स्वरूप सल्लागार समितीच्या स्वरूपाचे असले तरी ग्रंथालय परिषदेचे कार्य या राज्यातील ग्रंथालय चळवळीच्या वाढीस उपयुक्त ठरले आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, राज्य ग्रंथालय परिषदेबाबत महाराष्ट्र शासनाची वृत्ती पराकोटीची उदासीनतेची राहिली आहे. सहा वर्षांपूर्वी आजचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार विलासराव देशमुख या राज्याचे पहिल्याने मुख्यमंत्री झाले त्या वेळी सर्व राज्यस्तरीय महामंडळांची संचालक मंडळे तसेच राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय विविध शासकीय समित्यांची पुनर्रचना करण्यासाठी बरखास्त करण्यात आल्या. त्यांच्या समवेत राज्य ग्रंथालय परिषदही बरखास्त केली. त्यानंतर राज्य ग्रंथालय परिषद सोडून बरखास्त केलेल्या सर्व राज्यस्तरीय महामंडळांच्या संचालक मंडळांची तसेच राज्यस्तरीय , जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय विविध समित्यांची पुनर्रचना करण्यात आली. पण राज्य ग्रंथालय परिषद पुनर्गठित करण्यास गेली सहा वर्षे महाराष्ट्र शासनाला सवड झालेली नाही. ग्रंथालय परिषद दीर्घ काळ अस्तित्वात नसण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. सेना-भाजपा युतीचे सरकार सत्तेवर येण्यापूर्वीही काही वर्षे ग्रंथालय परिषद अस्तित्वात नव्हती. विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांना ग्रंथालय परिषदेवर प्रतिनिधित्व दिले जात असताना मागील सहा वर्षांत एकाही विधानसभा अगर विधान परिषद सदस्याला विधिमंडळात हा प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष याकडे वेधून घेण्याची आवश्यकता वाटली नाही. यावरून ग्रंथालयासंबंधी या राज्यातील लोकप्रतिनिधींची पराकोटीची अनभिज्ञता, अनास्था आणि उदासीनता दिसून येत आहे. मी स्वत: विधानसभेचा प्रतिनिधी म्हणून दोन वर्षे व राज्य ग्रंथालय संघाचा अध्यक्ष म्हणून दोन वर्षे ग्रंथालय परिषदेवर प्रतिनिधित्व केले आहे. ग्रंथालय परिषदेवरील माझ्या चार वर्षांच्या कालावधीत ग्रंथालय परिषदेच्या ज्या मोजक्याच सभा झाल्या त्या सभांना मंत्र्यापासून सर्व लोकप्रतिनिधींची उपस्थिती नगण्य स्वरूपाची असायची.



## परिषदेचा कालावधी पाच वर्षे असावा

राज्यातील सर्व निर्वाचित तसेच शासन नियुक्त मंडळे आणि समित्यांचा कालावधी पाच वर्षांचा असताना राज्य ग्रंथालय परिषद मात्र याला अपवाद ठरली आहे. राज्य ग्रंथालय परिषदेचा कालावधी सुरवातीपासून दोन वर्षांचा ठेवण्यात आला आहे. त्यात वाढ करून इतर राज्यस्तरीय समित्यांप्रमाणे राज्य ग्रंथालय परिषदेचा कालावधीही पाच वर्षांचा केला जाणे आवश्यक आहे. पण आमच्या लोकप्रतिनिधींना ग्रंथालय परिषदेचा कालावधी वाढवून घेण्याची आवश्यकता वाटलेली नाही. हे या राज्यातील ग्रंथालय परिषदेचे आणि ग्रंथालयीन चळवळीचे दुर्दैव म्हणायला हवे.

## ग्रंथालय कायद्यात कालानुरूप बदल आवश्यक

१९६७ साली महाराष्ट्र विधिमंडळाने संमत केलेला ग्रंथालय कायदा हा या राज्यातील एकमेव कायदा आहे की ज्या कायद्यात कायदा अस्तित्वात आल्यापासून एकही दुरुस्ती झालेली नाही. या कायद्यात कालानुरूप बदल करण्याची आवश्यकता कुणाही लोकप्रतिनिधीला कधी वाटली नाही. आणि तसा प्रस्ताव कुणाही लोकप्रतिनिधीला विधिमंडळात मांडण्याची आवश्यकता वाटली नाही. राज्य ग्रंथालय संघाने आणि राज्य ग्रंथालय कर्मचारी संघटनेने ग्रंथालय कायद्यात कालानुरूप बदल करण्याच्या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केल्याने महाराष्ट्र शासनाने तत्कालीन विधानपरिषद सदस्य श्री. व्यंकप्पा पत्की यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली. राज्यातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती आणि वेतननिश्चितीचा प्रश्नही या समितीकडे सुपूर्त करण्यात आला. पण एखादी गोष्ट शासनाला करायची नसली की, समिती नेमायची आणि समितीचा अहवाल शीतपेटीत गोठवून टाकायचा; ही शासनाची ठरलेली पद्धत आहे. ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या संदर्भात श्रीमती प्रभा राव समितीच्या अहवालाबाबत महाराष्ट्र शासनाने हेच केले आणि व्यंकप्पा पत्की अहवालाच्या बाबतीतही याचीच पुनरावृत्ती होण्याची शक्यता अधिक वाटत आहे. व्यंकप्पा पत्की समितीने अहवाल सादर करून दोन वर्षांचा कालावधी लोटला तरी राज्य सरकार त्याबाबत मूग गिळून गप्प बसले आहे. पण विधानसभा आणि विधानपरिषद यांमधील एकाही सभासदाला याबाबत सभागृहात चर्चा घडवून आणून सरकारला बोलते करण्याची आवश्यकता वाटली नाही, ही या राज्यातील लोकप्रतिनिधींची ग्रंथालय चळवळीबाबतची अनास्था म्हणायला हवी.

मी अंदाज समितीचा अध्यक्ष असताना ग्रंथालय संचालनालयाची तपासणी करून विधिमंडळाला अहवाल सादर केला होता. अशा प्रकारे तत्पूर्वी आणि त्यानंतरही ग्रंथालय संचालनालयाची तपासणी झालेली नाही. अंदाज समितीवरील लोकप्रतिनिधींना ग्रंथालय संचालनालयाची तपासणी करून संचालनालयाचा कारभार अधिक कार्यक्षम व लोकाभिमुख होण्यासाठी विधायक सूचना करण्याची आवश्यकता वाटली नाही ही खेदजनक गोष्ट आहे.

## आमदार-खासदार निधी आणि ग्रंथालये

आमदारांना वार्षिक साठ लाख रुपये तर खासदारांना वार्षिक दोन कोटी रुपये आपल्या मतदार संघातील विकास कामासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या निधीतून त्यांना ग्रंथालयांनाही मदत करता येते. प्रत्येक आमदाराने आणि खासदाराने प्रतिवर्षी त्यांना मिळणाऱ्या विकास निधीतून प्रत्येक विधानसभा मतदार संघातील एका ग्रंथालयाला मदत करायचे ठरविले तर वर्षाला राज्यातील सहाशे ग्रंथालयांना याप्रमाणे पाच वर्षांच्या कालावधीत तीन हजार ग्रंथालयांना अर्थसाहाय्य देता येईल. पण सामाजिक बांधिलकीची जाण ठेवून कर्तव्यबुद्धीने विकासनिधीतून ग्रंथालयाना मदत देणारे आमदार, खासदार, फारच थोडे आहेत. ग्रंथालयांना मदत करायला आमदार-खासदार उत्सुक नसतात याचे खरे कारण ग्रंथालये त्यांना 'व्होट-बँका' वाटत नाहीत हेच आहे असे अत्यंत खेदाने नमूद करावे लागत आहे. पण ग्रंथालये आमदार-खासदारांच्या कार्याची माहिती मतदारापर्यंत पोहोचविण्याचे मोलाचे कार्य करीत असतात, हे वास्तव लक्षात घेऊन आमदार-खासदारांनी ग्रंथालयांना कर्तव्यबुद्धीने मदत करायचे ठरविले तर या राज्यातील ग्रंथालये राज्याच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीची खऱ्या अर्थाने प्रतीके बनू शकतील. गाव तेथे ग्रंथालय हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आमदार-खासदारांनी आपल्या मतदारसंघातील ग्रंथालयांच्या वृद्धीसाठी यथाशक्ती हातभार लावावा एवढीच आमच्या लोकप्रतिनिधींकडून माफक अपेक्षा बाळगणे उचित होय.

❑❑❑



# RRRLF : सार्वजनिक ग्रंथालयासाठी वरदान

डॉ. धर्मराज वीर

*प्रस्तुत लेखात राजा राममोहन रॉय लायब्ररी फाउंडेशनच्या (RRRLF) ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला असून प्रतिष्ठानच्या समाननिधी आणि असमान निधी योजनेवर प्रकाश टाकला आहे. याशिवाय प्रतिष्ठानने १९७२-७३ ते २००५-०६ या कालावधीमधील निरनिराळ्या राज्यांना पुरविलेल्या निधीचे विश्लेषण केले आहे.*

## प्रस्तावना

सार्वजनिक ग्रंथालयासाठी वरदान ठरलेल्या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानची स्थापना राजा राममोहन रॉय यांच्या २०० व्या जयंती वर्षामध्ये म्हणजे मे १९७२ मध्ये करण्यात आली. योगायोगाने १९७२ हे आंतरराष्ट्रीय पुस्तक वर्ष आणि भारताच्या स्वातंत्र्याचे रौप्य महोत्सवी वर्ष होते. या प्रतिष्ठानची स्थापना ही भारत सरकारच्या सांस्कृतिक विभागाद्वारा झालेली असून वेस्ट बेंगाल सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६१ अंतर्गत संस्थेची नोंदणी झालेली आहे.

## प्रतिष्ठानचा उद्देश

प्रतिष्ठानचे मूळ उद्दिष्ट संपूर्ण देशातील ग्रंथालय सेवांना आणि सार्वजनिक ग्रंथालय सेवांना राज्य सरकारच्या, केंद्र सरकारच्या आणि या क्षेत्रातील इतर नोंदणीकृत स्वयंसेवी संघटनांच्या सक्रिय सहकार्याने आधार देणे आणि प्रोत्साहन देणे हे आहे. याशिवाय प्रतिष्ठानचे उद्देश खालील प्रमाणे आहेत :

(१) देशातील ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देणे;
(२) राष्ट्रीय ग्रंथालय पद्धती व राष्ट्रीय ग्रंथालय धोरण तयार करणे;

(३) ग्रंथालयांना तांत्रिक आणि आर्थिक सहकार्य पुरविणे;
(४) ग्रंथालय विकासात कार्य करणाऱ्या राष्ट्रीय, राज्य आणि विभागीय पातळीवरील संस्थांना अर्थसाहाय्य पुरविणे;
(५) देश आणि परदेशातील ग्रंथालय विकासावरील माहिती आणि नवीन कल्पना यासंबंधित सक्षम / योग्य साहित्य प्रकाशित करणे;
(६) ग्रंथालय विकासातील प्रश्न या प्रकारच्या संशोधनास प्रोत्साहन देणे; आणि
(७) देशातील ग्रंथालय विकासाबाबत सर्व दृष्टीने शासनास सल्ला देणे.

या प्रतिष्ठानाकडून मिळणारे अर्थसाहाय्य दोन प्रकारचे असते; जसे – समान साहाय्य योजना की ज्यामधील योजनेच्या अर्थसाहाय्यात प्रतिष्ठान आणि राज्य सरकार यांचा समान वाटा असतो आणि दुसरे असमान साहाय्य योजना यामध्ये मात्र फक्त प्रतिष्ठानचाच शंभर टक्के अर्थसाहाय्याचा हिस्सा आहे.

## (अ) समान साहाय्य योजना (Matching Assistance Schemes)

### (१) ग्रामीण ग्रंथ केंद्रे व फिरती ग्रंथालय सेवा वाढविण्यासाठी समान निधी योजनेमधून अर्थसाहाय्य

या योजनेअंतर्गत फिरती ग्रंथालय सेवा चालविणाऱ्या किंवा चालवू इच्छिणाऱ्या शासकीय, अनुदानित ग्रंथालये व स्वयंसेवी संस्था यांना अर्थसाहाय्य केले जाते. ग्रामीण व शहरी लोकांना वाचनाचा लाभ मिळवण्यासाठी ग्रंथकेंद्र व फिरती ग्रंथालय सेवा सुरू करण्यासाठी विचार करण्यास लावणारी ही योजना आहे. जिल्हा ग्रंथालय व इतर निवडक ग्रंथालये ही मूळ ग्रंथालये म्हणून काम करणार असून तेथून ग्रंथ, ग्रंथालय केंद्रांना पुरविले जातात. ज्या भागातील लोकांना ग्रंथालय सेवा उपलब्ध होत नाही, तेथे ग्रंथालय सेवा पोहचविणे व तेथील लोकांमध्ये वाचनाची आवड वाढविणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**अर्थसाहाय्य व्याप्ती**

या योजनेअंतर्गत खालील साहित्य खरेदीसाठी अर्थसाहाय्य दिले जाते.
(१) सायकल, रिक्षा किंवा कमी खर्चाची वाहने;
(२) ट्रंक किंवा पुस्तके साठविणे व वाहून नेण्याची साधने;
(३) पिशव्या; आणि
(४) ग्रंथ आणि इतर वाचनीय व दृक साधने.
वरील साहित्यासाठी कमाल रु. ५०,०००/– एवढे अनुदान मिळते.

### (२) परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व ग्रंथप्रदर्शने आयोजनासाठी समान निधी योजनेमधून अर्थसाहाय्य

या योजनेअंतर्गत समाजामध्ये ग्रंथालयाचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने व ग्रंथालय क्षेत्रात येऊ घातलेले नवीन प्रवाह आत्मसात करण्यासाठी प्रतिष्ठानकडून अर्थसाह्य देण्यात येते.



ही योजना समान अर्थसाहाय्य योजना यामध्ये समाविष्ट आहे. राज्यपातळीवरील परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा, आदी कार्यक्रमासाठी अंदाजित मान्य खर्चावर कमाल अर्थसाहाय्य रु.५०,०००/– तर प्रशिक्षण वर्ग आणि ग्रंथप्रदर्शनासाठी रु. २५,०००/– अनुदान दिले जाते.

### (३) ग्रंथ ठेवण्यासाठी व मांडणीसाठी समान निधी योजनेमधून अर्थसाहाय्य

ग्रंथालयातील वाचनसाहित्याचा साठा व योग्य मांडणी करण्यासाठी प्रतिष्ठानकडून अर्थसाहाय्य दिले जाते. या योजनेअंतर्गत रॅक / कपाटे ग्रंथ साठवणीसाठी व मांडणीसाठी साधने खरेदी करता येतात. त्यासाठी प्रत्येक ग्रंथालयास प्रत्येक वर्षी रु. ६,०००/– एवढे अर्थसाहाय्य दिले जाते.

या योजनेसाठी राज्यशासनाने चालविलेल्या किंवा अनुदान दिले जाणाऱ्या, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तसेच नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांच्या ग्रंथालयांना या समान निधी योजनेअंतर्गत अर्थसाहाय्य दिले जाते. यासाठी आवश्यक सोई, उत्पन्नाची साधने व मनुष्यबळ तसेच राज्यशासनाच्या मते ग्रंथालयाचे कामकाज समाधानकारक असावे लागते.

### (४) सार्वजनिक ग्रंथालयांना शैक्षणिक उपक्रमांसाठी टीव्ही, व्हीसीपी संच प्राप्तीसाठी समान निधी योजनेमधून अर्थसाहाय्य

ही योजना राज्यसरकार आणि प्रतिष्ठानच्या संयुक्त निधीमधून चालविली जाते. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयापेक्षा खालच्या स्तराच्या ग्रंथालयांना अर्थसाहाय्य देण्यासाठी ही योजना परिचित आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रंथालयास नावाजलेल्या कंपनीचा एक टीव्ही कम व्हीसीपी सेट यासोबत पाच शैक्षणिक कॅसेट / संगणक : तीन क्लायंटसह एक सर्वर, एक केव्हीए यूपीएस, मोडेम आणि एक प्रिंटर, इत्यादी साहित्यासाठी अर्थसाहाय्य दरवर्षी पुरविले जाते. या साहित्याला सद्यःस्थितीतील बाजार किमतीनुसार अर्थसाहाय्य पुरविले जाते.

### (५) सार्वजनिक ग्रंथालयांना इमारत विस्तार / बांधण्यासाठी समान निधी योजनेतून अर्थसाहाय्य

या योजनेअंतर्गत ग्रंथालयांना नवीन इमारत बांधकामासाठी किंवा इमारत विस्तारासाठी अर्थसाहाय्य दिले जाते. त्यासाठी ग्रंथालयाकडे स्वत:च्या मालकीचा भूखंड असणे आवश्यक असते. यामध्ये शासन आणि प्रतिष्ठान यांचा समान वाटा असतो. अर्थसाहाय्य दोन हप्त्यांमध्ये पुरविले जाते. जिल्हा ग्रंथालयासाठी जास्तीत जास्त १० लाख तर तालुका ग्रंथालयासाठी ८ लाख आणि इतर ग्रंथालयांसाठी ४ लाख रुपये १० वर्षातून एक वेळेस याप्रमाणे अर्थसाहाय्य दिले जातात.

## (आ) असमान अर्थसाहाय्य योजना (Non-Matching Schemes)

### (१) ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अर्थसाहाय्य

या योजनेनुसार स्वयंसेवी संस्था म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम २१,१८६० नुसार

नोंदणीकृत संस्था किंवा राज्याच्या कायद्यानुसार नोंदणीकृत संस्था किंवा इतर कायद्यानुसार विश्वस्त संस्थांना या योजनेतील अर्थसाहाय्य ७५:२५ हिस्सा पद्धतीने दिले जाते. मान्य अंदाजित खर्चाच्या ७५ टक्के हिस्सा प्रतिष्ठानचा असतो. तथापि, एकूण मान्य अंदाजपत्रकाच्या २५ टक्के एवढ्या रकमेचा वाटा संस्थेने उचलावयास हवा. प्रतिष्ठानकडून ग्रंथालय इमारत बांधकामासाठी १० वर्षांतून एकदा जास्तीत जास्त रु. ३ लाख याप्रमाणे आणि फर्निचर आणि साधनासाठी तीन वर्षांतून एकदा रु. ३० हजार याप्रमाणे आणि ग्रंथांसाठी प्रतिवर्षी रु. १५ हजार एवढे अर्थसाहाय्य दिले जाते.

ग्रंथांमध्ये मासिके, नियतकालिके व दैनिके अशा तात्पुरत्या कालावधीसाठी असलेले छापील साहित्य वगळून इतर छापील साहित्याचा समावेश असेल.

फर्निचर – यामध्ये कपाट, रॅक, सूचना फलक, वाचनकक्षासाठी टेबल व खुर्च्या, चादरी व सतरंजी यांचा समावेश असेल.

साधारणत: ग्रंथालय इमारत अनुदान देताना ग्रामीण ग्रंथालयासाठी तीन हजारपेक्षा जास्त ग्रंथ आणि शहरी ग्रंथालयासाठी चार हजारपेक्षा जास्त ग्रंथ असल्यास प्रतिष्ठानकडून अर्थसाहाय्य दिले जाते.

### (२) बालग्रंथालये किंवा सार्वजनिक ग्रंथालयाच्या बालविभागांना अर्थसाहाय्य योजना

ही एक असमान अर्थसाहाय्य योजना असून या योजनेअंतर्गत बाल ग्रंथालये, बालविभाग, माहिला विभाग आणि ज्येष्ठ नागरिक विभागांना अर्थसाहाय्य दिले जाते.

#### अर्थसाहाय्याचा उद्देश

- बालवाङ्मय साहित्य, तक्ते, नकाशे, शैक्षणिक खेळणी, प्रदर्शित करण्याचे फलक, इत्यादी खरेदी करणे.
- शैक्षणिक कारणास्तव दृक-श्राव्य साहित्य, उदाहरणार्थ- दूरचित्रवाणी संच, टेपरेकार्डर, शैक्षणिक कॅसेट्स, इत्यादी खरेदी करणे.
- महिला कक्षासाठी ग्रंथ खरेदी करणे, स्टील अलमारी, रॅक, टेबल, फायबर खुर्च्या आणि प्रदर्शित करण्याचे फलक खरेदी करणे.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी ग्रंथ, स्टील अलमारी, स्टील बुक केस, रॅक, टेबल, फायबर खुर्च्या, तसेच वृद्धांसाठी मोठी छापील पुस्तके, टॉकिंग बुक्स खरेदी करणे.

#### अर्थसाहाय्याचे स्वरूप

बालविभागासाठी प्रतिवर्षी रु. २५,०००/- अर्थसाहाय्य मिळू शकते. यामधील ६० टक्के रक्कम बालवाङ्मयावर खर्च करावी लागते. सार्वजनिक ग्रंथालयात महिला विभाग सुरू करण्यासाठी प्रतिवर्षी रु. १५,०००/- अर्थसाहाय्य मिळू शकते. यामधीलही ६० टक्के रक्कम महिलांविषयक ग्रंथांवर खर्च करावी लागते.



ज्येष्ठ नागरिकांची बौद्धिक भूक भागवणाऱ्या पुस्तकांसाठी रु. १०,०००/- प्रतिवर्षी अनुदान मिळू शकते. त्यापैकी ६० टक्के रक्कम ज्येष्ठ नागरिकांना उपयोगी पडणाऱ्या ग्रंथावर खर्च करणे अनिवार्य असते. या योजनेत सहसा सलग दोन वर्षे अनुदान दिले जात नाही.

### (३) ग्रंथालयाचे १००/१२५/१५०/१७५ वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसाहाय्य

ज्या शासनमान्य व नोंदणीकृत ग्रंथालयांना १००/१२५/१५०/१७५ वर्षे पूर्ण झाली आहेत अशा सार्वजनिक ग्रंथालयांना या योजनेअंतर्गत अर्थसाहाय्य मिळू शकते.

#### अर्थसाहाय्याची व्याप्ती

- प्रसंगानुरूप परिसंवाद / कार्यशाळा आयोजनासाठी कमाल रु. ५,०००/-
- ग्रंथ व फर्निचर खरेदीसाठी कमाल रु. ५,०००/-
- ग्रंथालय इमारत दुरुस्ती, रंगकाम यांसारख्या नूतनीकरणासाठी कमाल रु. ३०,०००/-
- ग्रंथालय चळवळ, निबंध स्पर्धा, चर्चासत्र व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनासाठी कमाल रु. ५,०००/-
- ग्रंथालयक्षेत्रातील प्रख्यात व अनुभवी व्यक्तीस रोख स्वरूपात पारितोषिक देण्यासाठी रु. २,५००/-
- शैक्षणिक व सांस्कृतिक दर्शन घडविणारा शताब्दी खंड (स्मरणिका नव्हे) प्रकाशित करण्यासाठी रु. १०,०००/-
- कर्मचाऱ्यांनी दिलेल्या उत्तम, कार्यक्षम सेवा समर्पणाप्रीत्यर्थ्य ४ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रु. ५००/- प्रमाणे रोख पारितोषिक देण्यासाठी असे एकूण कमाल रु. २,०००/-

याप्रमाणे वर उल्लेख केलेल्या सर्व बाबींकरिता प्रतिष्ठानकडून जास्तीत जास्त रु. ५०,०००/- एवढे अर्थसाहाय्य मिळू शकते.

वरील सर्व योजनेअंतर्गत प्रस्ताव हे प्रत्येक वर्षी साधारणत: ३० जुलैपर्यंत संबंधित विभागाच्या साहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयामार्फत राज्य ग्रंथालय संचालक कार्यालयाच्या व राज्य ग्रंथालय परिषदेच्या शिफारसीसह प्रतिष्ठानकडे पाठविले जातात. प्रत्यक्ष प्रतिष्ठानकडे पाठविलेल्या प्रस्तावाचा विचार केला जात नाही. प्रतिष्ठानच्या कोणत्याही अर्थसाहाय्य योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या वस्तूवर "Purchased with the assistance from Raja RamMohan Roy Library Foundation" असा उल्लेख करणे अनिवार्य असते.

### प्रतिष्ठानचे यश

अनेक प्रशासकीय निर्बंध असूनही प्रतिष्ठानने देशातील जवळपास २५,००० ग्रंथालयांना १९७२-१९९२ या दरम्यान रु. १,४५५ लाख एवढे अर्थसाहाय्य पुरविले. यामधील प्रतिष्ठानला सातव्या पंचवार्षिक योजनेत (१९८५-९०) रु. ६१४.४० लाख केंद्रशासनाकडून योजना अनुदान म्हणून मिळाले होते आणि रु. २७९.७५ लाख निरनिराळ्या राज्यशासनाकडून त्यांचा हिस्सा

म्हणून मिळाला. म्हणजे सरासरी वार्षिक योजना अनुदान रु. १२२.८८ लाख आणि सरासरी राज्याचा हिस्सा म्हणून रु. ५५.९५ लाख प्राप्त झाले.

प्रतिष्ठानच्या वाढत्या उपक्रमांना लक्षात घेता आठव्या पंचवार्षिक योजनेत (१९९२-९७) केंद्रातर्फे एकूण योजना अनुदान रु. ११७५ लाखापर्यंत गेले जे की, सरासरी वार्षिक योजना अनुदान रु. २३५.१४ लाख होते. तसेच राज्यांचा हिस्सा रु. ६४५.९७ लाख म्हणजे सरासरी रु. १२९.१९ लाख इतका आला. परिणामत: आठव्या पंचवार्षिक योजनेत ग्रंथालयांना प्रतिष्ठानने दिलेले अर्थसाहाय्य ११८८.५२ लाखांपर्यंत गेले; ज्याची वार्षिक सरासरी रु. २३७.७० लाख इतकी होती.

सन २००५-०६ या कालावधीचा विचार करता असे दिसून येते की, या वर्षीचा केंद्रशासनाकडून उपलब्ध होणारा निधी हा रु. १५९१.३० लाख एवढा आहे. याबाबत केंद्रशासनाकडून राज्यनिहाय मिळाणारा निधी सारणी क्र. १ मध्ये दर्शविला आहे.

**सारणी क्र. १**

**राज्यनिहाय वाटप होणारा निधी : २००५-०६**

| *अ.क्र.* | *राज्य/केंद्रशासित प्रदेशाचे नाव* | *केंद्रशासनाचा एकूण हिस्सा रक्कम रु. लाखात* | *प्रतिशत प्रमाण* | *संचित वारंवारिता* | *प्रतिशत संचित वारंवारिता* |
|---|---|---|---|---|---|
| *१* | *२* | *३* | *४* | *५* | *६* |
| १ | आंध्र प्रदेश | १००.०० | ६.२८ | १००.०० | ६.२८ |
| २ | गुजराथ | १००.०० | ६.२८ | २००.०० | १२.५६ |
| ३ | कर्नाटक | १००.०० | ६.२८ | ३००.०० | १८.८४ |
| ४ | केरळ | १००.०० | ६.२८ | ४००.०० | २५.१२ |
| ५ | महाराष्ट्र | १००.०० | ६.२८ | ५००.०० | ३१.४० |
| ६ | तमिळनाडू | १००.०० | ६.२८ | ६००.०० | ३७.६८ |
| ७ | पश्चिम बंगाल | १००.०० | ६.२८ | ७००.०० | ४३.९६ |
| ८ | पँडेचरी | २५.०० | १.५७ | ७२५.०० | ४५.५३ |
| ९ | हिमाचल प्रदेश | २४.८० | १.५६ | ७४९.८० | ४७.०९ |
| १० | ओरिसा | ३७.५० | २.३६ | ७८७.३० | ४९.४५ |
| ११ | राजस्थान | ७५.०० | ४.७१ | ८६२.३० | ५४.१६ |
| १२ | अंदमान निकोबार | ४.५० | ०.२८ | ८६६.८० | ५४.४४ |
| १३ | चंदीगढ | १५.०० | ०.९४ | ८८१.८० | ५५.३८ |
| १४ | दादरा आणि नगर हवेली | १.५० | ०.१० | ८८३.३० | ५५.४८ |
| १५ | गोवा | १.५० | ०.१० | ८८४.८० | ५५.५८ |
| १६ | उत्तरांचल | १५.०० | ०.९४ | ८९९.८० | ५६.५२ |
| १७ | बिहार | १५.०० | ०.९४ | ९१४.८० | ५७.४६ |
| १८ | हरियाणा | ७.५० | ०.४७ | ९२२.३० | ५७.९३ |
| १९ | जम्मू आणि काश्मीर | ३७.५० | २.३६ | ९५९.८० | ६०.२९ |
| २० | मध्यप्रदेश | ६०.०० | ३.७७ | १०१९.८० | ६४.०६ |
| २१ | पंजाब | ७.५० | ०.४७ | १०२७.३० | ६४.५३ |
| २२ | उत्तर प्रदेश | ११२.५० | ७.०७ | ११३९.८० | ७१.६० |
| २३ | दिल्ली | ३०.०० | १.८९ | ११६९.८० | ७३.४९ |
| २४ | लक्षद्विप | १.५० | ०.१० | ११७१.३० | ७३.५९ |
| २५ | झारखंड | ७.५० | ०.४७ | ११७८.८० | ७४.०६ |
| २६ | छत्तीसगढ | ७.५० | ०.४७ | ११८६.३ | ७४.५३ |
| २७ | आसाम | ४५.०० | २.८३ | १२३१.३० | ७७.३६ |
| २८ | मणिपूर | ४५.०० | २.८३ | १२७६.३० | ८०.१९ |
| २९ | मेघालय | ४५.०० | २.८३ | ३१२१.३० | ८३.०२ |
| ३० | नागालँड | ४५.०० | २.८३ | १३६६.३० | ८५.८५ |
| ३१ | सिक्कीम | ४५.०० | २.८३ | १४११.३० | ८८.६८ |
| ३२ | त्रिपुरा | ४५.०० | २.८३ | १४५६.३० | ९१.५१ |
| ३३ | अरुणाचल प्रदेश | ४५.०० | २.८३ | १५०१.३० | ९४.३४ |
| ३४ | मिझोरम | ९०.०० | ५.६६ | १५९१.३० | १००.०० |
| | एकूण | १५९१.३० | १०० | १५९१.३० | १०० |



सारणी क्र. १ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सर्वांत जास्त निधी उत्तरप्रदेश या राज्याचा असून सर्वांत कमी निधी दादरा नगर हवेली, गोवा आणि लक्षद्वीप या राज्य / केंद्रशासित प्रदेशांचा आहे. तर सर्व राज्य / केंद्रशासित प्रदेशांचा सरासरी निधी हा रु. ४६,८०,२९४/- एवढा असल्याचे दिसते.

## सारांश

देशातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन झालेल्या या प्रतिष्ठानच्या समान अर्थसाहाय्य आणि असमान अर्थसाहाय्य अशा दोन प्रकारच्या योजना आहेत. कमीत कमी रु. ६,००० ते जास्तीत जास्त रु. १० लाखांपर्यंत अर्थसाहाय्य या योजनेअंतर्गत पुरविले जाते. आजपर्यंतच्या अर्थसाहाय्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, असमान अर्थसाहाय्य योजनेअंतर्गत जास्त निधी उपलब्ध करून दिल्याचे दिसून येते. एकंदरीत पाहता प्रतिष्ठानकडून मिळणाऱ्या भरीव योगदानातून ग्रंथालय चळवळीला बळकटी आली आहे हे निश्चित.

## संदर्भ

(१) महाराष्ट्र ग्रंथालय संचालनालय (१९९१) : *सार्वजनिक ग्रंथालय विकास योजना*, मुंबई, शासकीय मुद्रणालय.

(२) Raja RamMohan Roy Library Foundation (1997) : *Book for the Millions at their Doorsteps*, Kolkata, RRRLF.

(३) Panda B. D., (1993) *: HandBook of Public Library System,* New Delhi : Anmol Publication, pp. 183-194.

(४) Raja RamMohan Roy Library Foundation (2005) : Official Document : Guidelines about implementing Action Plan for the year 2005-06, dated 01-04-2005.

❑❑❑





# *NISCAIR विज्ञानविषयक माहिती व माहितीसाधने पुरविणाऱ्या भारतीय माहिती संस्थेची वेबसाईट*

डॉ. राजेंद्र कुंभार

National Institute Science Communication And Information Resources (NISCAIR)

Web address : http://www.niscair.res.in/

पूर्वी INSDOC या नावाने सुपरिचित असलेल्या माहिती केंद्राचे NISCAIR हे सध्याचे नाव आहे.

भारतातील शास्त्रज्ञांना, विज्ञानविषयाच्या शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना माहितीसेवा पुरविणारी ही एक प्रमुख संस्था आहे. भारत सरकारने Council for Scientific and Industrial Research (CSIR) अंतर्गत स्थापन केलेले हे एक अत्यंत सक्रिय माहिती केंद्र आहे. या केंद्राकडे विज्ञानविषयक ग्रंथ व ग्रंथेतर स्वरूपातील वाचनसाहित्य उपलब्ध आहे. हे केंद्र विज्ञानविषयक अनेक नियतकालिकेही प्रकाशित करते. तसेच Indian Science Abstracts आणि इतरही काही सार नियतकालिकेही प्रकाशित करते. भारतातील विज्ञान विषयाच्या नियतकालिकांची संघ तालिका (National Union Catalogue of Scientific Serials in India - NUCSSI) हे या संस्थेने तयार केलेले एक उपयुक्त माहिती साधन आहे. ही संघ तालिका चार मुद्रित खंडांत तसेच CD-Rom वरही उपलब्ध आहे.

निस्केअर (NISCAIR) या माहिती संस्थेची भारतातील व जगातील माहितीच्या उपभोक्त्यांना ओळख व्हावी व त्यांना या संस्थेकडील सेवा-सुविधांचा पुरेपूर उपयोग करता यावा यासाठी ही वेबसाईट तयार केलेली आहे.

निस्केअर या माहितीसंस्थेच्या सदरील वेबसाईटवरील माहिती एकूण सात मुख्य भागांत विभागलेली आहे.

### भाग १

About NISCAIR या शीर्षकाखाली निस्केअरचे ध्येय आणि उद्दिष्टे, प्रमुख अधिकारी, त्यांचे दूरध्वनी क्रमांक व ई-मेल पत्ते दिलेले आहेत. निस्केअर आणि इतर आंतरराष्ट्रीय

माहितीसंस्थांच्या संयुक्त उपक्रमांची (Collaboration) माहिती त्या संस्थांच्या वेब पत्त्यांसह या भागात दिली आहे.

### भाग २

Information Resources या शीर्षकांतर्गत संस्थेकडील माहिती साधनांचा परिचय करून दिला आहे. यामध्ये National Science Library (NSL) ची माहिती दिलेली आहे. या माहितीमध्ये NSL च्या सभासदत्वाचे निकष, त्यांच्याकडील वाचनसाहित्याची प्रकारानुसार संख्या तसेच NSL च्या इतर सेवांची माहिती दिलेली आहे. याच भागात वेबओपॅक वापरून NSL मधील वाचनसाहित्याच्या सूचीय नोंदी शोधण्याची सुविधा दिलेली आहे.

निस्केअरचे सभासद होण्यासाठीचे शुल्क, अनामत रक्कम, अटी व नियमांची माहिती Membership या शीर्षकाखाली दिलेली आहे.

निस्केअर पुरवीत असलेल्या विविध सेवांची माहिती याच भागात तक्त्याच्या स्वरूपात दिलेली आहे. या तक्त्यामध्ये निस्केअरच्या प्रत्येक सेवेचे नाव, त्या सेवेसाठीचे शुल्क संपर्क साधावयाच्या व्यक्तीचे नाव, इत्यादी माहिती दिली आहे.

संगणक वाचनीय वाचनसाहित्याची माहिती याच भागात Electronic Resources या शीर्षकाखाली दिलेली आहे. ही माहिती पुढील तीन उपशीर्षकांमध्ये विभागलेली आहे : (अ) Online Databases, (२) CD-ROM Databases (क) e-journals consortia

In-house databases या शीर्षकांतर्गत निस्केअरने तयार केलेल्या NUCSSI, INPAT, ISA, इत्यादी डेटाबेसेसची माहिती दिलेली आहे. यामध्ये हे डेटाबेसेस तयार करण्याची प्रक्रिया आणि त्यातील समाविष्ट माहितीचे (Contents) स्वरूप दिलेले आहे.

### भाग ३

Science Communication या तिसऱ्या भागामध्ये निस्केअर ही संस्था समाजासाठी कशी उपयुक्त आहे याचे विवेचन दिलेले आहे. याच भागामध्ये निस्केअर प्रकाशित करत असलेल्या सार नियतकालिकांचे आणि निस्केअरच्या विज्ञानाच्या लोकप्रियतेसाठीच्या प्रयत्नांचे वर्णन केलेले आहे.

### भाग ४

Activities and Services या भागामध्ये निस्केअरच्या मनुष्यबळ विकास उपक्रमांची माहिती दिलेली आहे. तसेच e-journals consortia या प्रकल्पाचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट केली आहे. वेबसाईटवरील Services या शीर्षकाखाली Electronic Publishing, Editing आणि Print and Production या सेवांची माहिती दिलेली आहे. या सेवा



निस्केअरमार्फत उपभोक्त्यांना कशा पुरविल्या जातात याचेही विवेचन वेबसाईटवरील या भागात केलेले आहे.

वेबसाईटच्या याच भागात Products या शीर्षकाखाली निस्केअरने तयार केलेल्या माहिती साधनांचे (Information Products) वर्णन केलेले आहे. यामध्ये NUCSSI on CD-ROM, ISA on CD-ROM अशा माहिती साधनांमधील नोंदींची संख्या, या सीडीमधून सूचीय नोंदी शोधण्याच्या शोध सुविधा (Search parameters), इत्यादी माहिती दिलेली आहे.

### भाग ५

Downloads या भागात निस्केअरकडील जी माहिती उपभोक्ते online पद्धतीने शोधून Download करू शकतात त्याचे विवेचन दिलेले आहे. Download करावयाची माहिती कोणत्या फॉरमॅटमध्ये आहे (Word, PDF) हेही नमूद केलेले आहे.

### भाग ६

News and current events या भागामध्ये निस्केअरच्या कार्यक्षेत्रातील प्रचलित घटना व घडामोडींची माहिती दिली जाते.

### भाग ७

Contact us : बहुतांश वेबसाईटप्रमाणेच या शेवटच्या भागात निस्केअरचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, फॅक्स व ई-मेलचा पत्ता दिलेला आहे.

निस्केअर ही भारतातील विज्ञानक्षेत्रातील संशोधकांना माहितीसेवा पुरविणारी प्रमुख संस्था आहे. या संस्थेकडे समृद्ध असा वाचनसाहित्य संग्रह आहे. या वाचनसाहित्याचा शोध घेण्यासाठी अत्याधुनिक साधने व सुविधा आहेत. संस्थेने स्वत: विकसित केलेली माहिती साधनेही आहेत. संस्थेकडील वाचनसाहित्य आणि माहिती देशातील संशोधकांना उपलब्ध करून देण्यासाठीची यंत्रणा व पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. या सर्व सामर्थ्यांच्या आधारावर निस्केअर भारतीय संशोधकांना उपयुक्त माहिती सेवा परिणामकारपणे पुरवीत आहे. निस्केअरच्या सर्व सेवा व सामर्थ्यांची ओळख करून देणारी, माहिती देणारी सदरची वेबसाईट नियमितपणे अद्ययावत ठेवली जाते.

आपल्या ग्रंथालयाच्या उपभोक्त्यांना मूल्यवर्धित सेवा देण्यासाठी प्रत्येक ग्रंथपालास या संस्थेच्या वेबसाईटचा परिचय असणे उपयुक्त आहे.

❑❑❑

# रद्दबातल ग्रंथांची विक्री : एक अनुभव

प्रकाश बोडके

*ग्रंथ रद्दबातल करणे अनेक कारणांमुळे आवश्यक ठरते. रद्दबातल ग्रंथांचे काय करावयाचे असा प्रश्न नेहमीच ग्रंथपालापुढे असतो. सदर लेखामध्ये रद्दबातल केलेल्या ग्रंथांची विक्री करून हा प्रश्न सोडविता येतो, याबाबतचा अनुभव सांगितला आहे. तसेच अशा विक्रीच्या माध्यमातून ग्रंथालयाला काही आर्थिक मदतही मिळू शकते हे या लेखातून समजते.*

## प्रस्तावना

डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी सांगितलेल्या 'ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे', या सूत्राचा प्रभाव आजही ग्रंथपाल, ग्रंथालय व्यवस्थापन आणि वाचक यांच्यावर आहे. ग्रंथालय वाचनसाहित्याविषयी अनेक प्रकारची कौशल्ये ग्रंथपाल ग्रंथालय धोरण ठरविताना वापरत असतात. ह्यामध्ये जुन्या वाचनसाहित्याची जपवणूक, नवीन वाचनसाहित्य खरेदी, ग्रंथालयाकडे असणाऱ्या वाचनसाहित्याची देखभाल, इत्यादी बाबी येतात. ग्रंथालयाची सुसज्ज, समृद्ध व निकोप वाढ करण्याचा महत्त्वाचा एक भाग म्हणजे ठरावीक वाचनसाहित्य रद्दबातल करत राहणे हे होय. आज माहितीच्या युगात माहितीचा प्रचंड महापूर इंटरनेट, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमाद्वारे दारोदार पोहोचला आहे. ग्रंथालयांनी त्याचे भान ठेवून वेळोवेळी अनावश्यक, जास्त प्रती असणारे वाचनसाहित्य रद्दबातल करणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्रंथालयातील देखभाल, जागा, उपकरणे, फर्निचर, मनुष्यबळ, इत्यादी बाबींचा अपव्यय होणार नाही. उलट ग्रंथालय साधनसामग्रीचा परिणामकारक वापर करणे शक्य होईल.

बऱ्याच वाचनसाहित्याचे उपयोगमूल्य साधारणपणे २५ वर्षांत नष्ट होते. काळाच्या ओघात काही वाचनसाहित्यातील आशय चुकीचा सिद्ध होण्याचीही शक्यता असते. असे कालबाह्य वाचनसाहित्य ग्रंथालयात ठेवल्यामुळे ग्रंथालयाचा कोणताही हेतू साध्य होत नाही. उलट कपाटातील जागा मात्र अडवली जाते. म्हणून जुने, अनावश्यक ग्रंथ नियमितपणे रद्दबातल करून नवीन ग्रंथांना जागा उपलब्ध करून देणे हे योग्य धोरण होय.

वाचनसाहित्याचा साठा अद्ययावत ठेवण्याच्या हेतूने व नवीन वाचनसाहित्य संग्रहविकास



धोरणाच्या हेतूने अनावश्यक व निरुपयोगी वाचनसाहित्य ग्रंथालयातून रद्दबातल करणे आवश्यक असते.

खालील कारणांमुळे वाचनसाहित्य रद्दबातल करण्याची आवश्यकता भासते.

(१) जागेची टंचाई,

(२) उपयोगास अयोग्य,

(३) ग्रंथ सांभाळण्यावर होणारा खर्च,

(४) ग्रंथाचा शोध घेण्यात अडथळा,

(५) ग्रंथसंग्रहाच्या गुणवत्तेवर परिणाम, इत्यादी

रद्दबातल करावयाच्या साहित्याची यादी पुढीलप्रमाणे असू शकते.

(०१) पाने फाटलेली पुस्तके

(०२) पाने जीर्ण झालेली पुस्तके

(०३) निर्देशिका

(०४) पाठ्यपुस्तकांच्या अनेक प्रती

(०५) विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयावरील पुस्तके

(०६) वार्षिके

(०७) हस्तलिखिते

(०८) सीडीआय मॉयक्रोफॉर्म्स (CDI Microforms)

(०९) प्रकल्प अहवाल

(१०) जुन्या आवृत्त्या

(११) प्रश्नपत्रिका संच

(१२) विविध प्रकारच्या प्रकाशन याद्या

(१३) वर्तमानपत्रे

(१४) भेट अंक

(१५) नमुना प्रती

(१६) देणगी भेट प्रती

(१७) नकाशे व तक्ते

(१८) अभ्यासक्रम पुस्तिका

## ग्रंथ रद्दबातल करताना आलेला प्रत्यक्ष अनुभव

के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक यांचे 'कुसुमाग्रज मध्यवर्ती ग्रंथालय' हे २५,००० चौ. फूट क्षेत्रफळ असलेली स्वतंत्र इमारत असून सदर इमारत ही तळमजला अधिक तीन अशा विभागांत विभागली आहे. तळमजल्यावर देवघेव व स्टॅकिंग, प्रोसेसिंग रूम व ग्रंथपालांचे कार्यालय आहे. पहिला मजला वर्तमानपत्रे व मासिके विभाग, दुसरा मजला संदर्भ विभाग व ई-लायब्ररी, तिसरा मजला अभ्यासिका अशी रचना आहे.

ग्रंथालयाचे संपूर्ण संगणकीकरण झाले असून बारकोड पद्धती वापरून पुस्तकांची देवघेव करण्यात येते. ग्रंथालयात सुमारे ५० हजार ग्रंथ असून २०० हून अधिक देशी व परदेशी शैक्षणिक नियतकालिके येतात. ग्रंथालयात एकूण ११ कर्मचारी कार्यरत आहेत. ग्रंथालय समितीद्वारे ग्रंथसंग्रह विकासाचे धोरण ठरवून त्यानुसार वाचनसाहित्य संग्रहाचा विकास केला जातो. सदर महाविद्यालय १९८४ साली स्थापन झाले. सुरुवातीस सदर महाविद्यालय हे ग्रामीण भागात असल्यामुळे व प्रशिक्षित ग्रंथपाल नसल्यामुळे ग्रंथसंग्रह विकास संथगतीने चालू होता. सुरवातीला एका विषयास जितके विद्यार्थी तितक्या प्रती घेतल्या जात. तसेच विशेष करून स्थानिक लेखकांची पुस्तके घेतली जात. त्यामुळे जेव्हा जेव्हा विद्यापीठाने अभ्यासक्रमात बदल केला त्या त्या वेळी सदर ग्रंथ हे निरुपयोगी होत गेले. नंतरच्या काळामध्ये हे निरुपयोगी ग्रंथ रद्दबातल करण्यासाठी ग्रंथालय समितीच्या सहकार्याने ग्रंथरद्दबातल धोरण ठरविण्यात आले. रद्दबातल करावयाच्या ग्रंथांचे दोन प्रकार करण्यात आले : (१) अतिशय फाटलेले, व (२) अभ्यासक्रमातून बाद झालेले. अशा ग्रंथांची यादी व गठ्ठे बनवले. प्राचार्यांची परवानगी घेऊन सदर गठ्ठे स्वतंत्र खोलीत ठेवले. व या ग्रंथांच्या रद्दबातलाची संपूर्ण प्रक्रिया (ठराव, ऑडिट, नोंदणी वही पूर्ण करून प्रत्येक पुस्तकावर weeded out चा शिक्का मारला) पूर्ण केली आणि हे ग्रंथ विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना विकण्याचे ठरविण्यात आले.

## रद्दबातल ग्रंथांची विक्री

रद्दबातल करावयाच्या ग्रंथांची विक्री - किंमत ठरवण्यासाठी मा. प्राचार्य यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली. त्या समितीने सर्व सारासार विचार करून पुस्तकांची किंमत ठरवताना, मूळ किमतीच्या फक्त २०% किंमत आकारून ग्रंथविक्री करावी असा आदेश दिला. कारण जर किंमत जास्त ठेवली तर असे ग्रंथ सहजासहजी शिक्षक व विद्यार्थी विकत घेण्यास तयार होणार नाही, म्हणून कमीत कमी किंमत ठेवून ग्रंथविक्री होण्यास त्याचा फायदा होईल हा दृष्टिकोन त्यामागे ठेवण्यात आला. सदर प्रदर्शनासाठी (विक्रीसाठी) ग्रंथालयाच्या शेजारील हॉलमध्ये व्यवस्था करण्यात आली. महाविद्यालयाच्या वेगवेगळ्या नोटीस बोर्डांवर त्यासंबंधीच्या सविस्तर नोटीस लावण्यात आल्या व प्रसिद्धी देण्यात आली. सदर विक्री प्रदर्शन हे दोन आठवडे सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आले. विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या ग्रंथाची एक एक प्रत टेबलावर मांडून त्या ग्रंथावर विक्री किंमत लिहिण्यात आली व



जास्तीच्या प्रती ह्या टेबलाखाली ठेवण्यात आल्या. ह्या कामासाठी ग्रंथालयातील दोन कर्मचारी ह्यांचेवर सदर जबाबदारी ठेवण्यात आली. ह्या कर्मचाऱ्यांनी दररोज विक्री करून हिशेब व बिले महाविद्यालयाच्या वित्त विभागाकडे सपूर्द करत गेले. ग्रंथ विक्री प्रदर्शनास चांगला प्रतिसाद मिळाला. एकूण ४,३०० ग्रंथ विक्रीसाठी ठेवण्यात आले, त्यांपैकी १,५०० ग्रंथांची विक्री झाली व त्यातून सुमारे रुपये १८,०००/- इतके उत्पन्न महाविद्यालयास मिळाले. तसेच याच संस्थेच्या इतर महाविद्यालयांस सदर ग्रंथ भेट म्हणून देऊ केले व प्रत्येक ग्रंथाच्या पाच प्रती ग्रंथालयात कायमस्वरूपी सुरक्षित ठेवण्यात आल्या. न विकलेल्या (शिल्लक) ग्रंथांची भांडार विभागामार्फत योग्य ती विल्हेवाट लावली.

वरील प्रक्रियेमुळे ग्रंथालयामध्ये जागा मोकळी झाली. तसेच बारकोडिंगची स्टेशनरी वाचली व ग्रंथालय हे आवाक्यात आणण्याचा प्रयत्न केला. सदर योजनेमुळे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना कमीत कमी किमतीत स्वतःचा ग्रंथसंग्रह विकसित करण्यास मदत झाली.

वरील अनुभवातून ग्रंथ विकत घेताना प्रत्येक ग्रंथाच्या तीन प्रती ह्याप्रमाणे धोरण ठरवण्यास मदत होऊन ते प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यात आले.

❑❑❑

# अजून ताजा वास जुन्याला

विष्णु रामचंद्र ठकार

## *पुस्तकालयांनी हाती धरण्याजोगी काही कार्ये*

*ग्रंथ संकलन, संग्रहण, वर्गीकरण, तालिकीकरण ही ग्रंथालयाची कार्ये आहेत हे आपणास आज माहीत आहेच. परंतु ही कार्ये ग्रंथालयाची आहेत असे सांगत आहेत श्री. विष्णु रामचंद्र ठकार; तेही इ.स. १९१२ मध्ये. वर नमूद केलेल्या ग्रंथालयाच्या सर्वसामान्य कार्याबरोबर श्री. ठकार यांनी नमूद केलेली पुढील दोन कार्ये विशेष आहेत : (१) लोकाभिरुचीस वळण लावणे, आणि (२) ग्रंथकाराच्या लेखणीस आळा घालणे. ही कार्ये म्हणजे आधुनिक ग्रंथालयांच्या दृष्टीने मूल्यवर्धित सेवाच (Value added services) आहेत.*

पुस्तकांचे 'आलय' पुस्तकांचे 'माहेरघर' यातच पुस्तकालयांच्या आदि व मुख्य कार्याचा बोध होतो. पुस्तकालयांचे पहिले महत्त्वाचे कार्य म्हटले म्हणजे जुन्या व नव्या ग्रंथांचा संग्रह करणे हे होय. यावरूनच पुस्तकालयास 'ग्रंथसंग्रहालय' असे पर्यायवाचक नाव मिळाले असावे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयासारख्या ठिकाणी त्या संस्थेचा 'संग्रहालय' व 'वाचनालय' अशी दोन पृथक् अंगे काढण्याचा तरी हाच हेतू आहे. जुने ग्रंथ जेव्हा दुर्मीळ होतात, त्यांच्या मुद्रित प्रती मिळत नाहीत तेव्हा अशा संग्रहालयाचे महत्त्व अधिक असते. वाग्देवीच्या शोधक भक्तांस ह्या पूजासाहित्याचा तिच्या पूर्ण कृपाप्रसादप्राप्तीस फार उपयोग पडतो. साहित्याचे ऐतिहासिक दृष्ट्या समालोचन करणारास हा एक अपूर्व निधीच वाटतो. म्हणूनच जुन्या ग्रंथांचा संग्रह करणे अत्यंत महत्त्वाचे होय. त्याचप्रमाणे जुन्या कागदपत्रांचाही संग्रह करणे हे ग्रंथसंग्रहालयाच्या वरील कार्याच्या अंगीभूत आहे. इतकेच नव्हे तर सरकारी कागदपत्रांचा संचय करून ते प्रकाशित करण्याचे काम अमेरिकेमध्ये तिकडील पुस्तकालय संस्थेकडे सोपविले जाते.

पुस्तकांचे संग्रहालय बनवूनच पुस्तकालयाचे कार्य भागत नाही, तर संग्रहित पुस्तकांची नीट रितीने जोपासना करणे हेही पुस्तकालयाचेच काम आहे. नाही तर पुस्तकांस कसरीसारखे उपभोक्ते मिळून बऱ्याच पुस्तकांचा संग्रह त्यांच्या भक्ष्यस्थानी पडण्याचा संभव आहे. पाश्चात्त्य देशांत पुस्तकांची जोपासना करण्याचे एक निराळे सांगोपांग शास्त्रच बनले असून त्यावर 'पुस्तक



संगोपन' (Care of Books), 'पुस्तकशत्रू' (Enemies of Books) सारखे निराळे ग्रंथही निर्माण झाले आहेतच व आणखी होत आहेत. पुस्तकसंगोपनात पुस्तके बांधण्याच्या कार्याचाही समावेश होतो. मराठीमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची बांधणी टिकाऊ नसते ह्यांची कारणे जरी सांप्रत अनेक असली तरी भविष्य कालाकडे नजर देऊन ग्रंथप्रकाशकांनी ह्या महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष द्यावे. पुस्तकांची बांधणी शक्य तेवढी मजबूत व दिखाऊ असली पाहिजे. पुस्तकाच्या अंतरंगाकडे चित्ताकर्षण होण्यास पुस्तकांचे बहिरंगही तसे मोहक पाहिजे. ज्या पुस्तकालयांतील पुस्तकांचा प्रसार अधिक त्या पुस्तकालयास तर पुस्तकांच्या जोपासनेकडे फारच लक्ष पुरविले पाहिजे. कारण निरनिराळ्या दर्जाचे वाचक निरनिराळ्या तऱ्हेने पुस्तके वापरतात ह्यामुळे, तसेच त्यांच्या अधिक प्रसारामुळे पुस्तकांस जीर्णदशा लवकर येते असा अनुभव आहे. म्हणून या बाबतीत पुस्तकालयाने विशेष लक्ष पुरवून पुस्तके सुस्थितीत ठेविणे हे पुस्तकालयांचे मुख्य कार्य आहे.

पुस्तकांचा संग्रह झाला, व त्यांची योग्य जोपासना झाली म्हणजे मग त्यांची विषयवार व्यवस्था लावणे हेही पुस्तकालयांचेच कार्य आहे. सुव्यवस्थित रितीने पुस्तके ठेवता येण्यास देश, भाषा व भाषेतील ग्रंथसंग्रह ह्यांस अनुरूप अशी शास्त्रीय वर्गीकरणाची विशिष्ट पद्धती तयार करून ग्रंथव्यवस्था लाविली पाहिजे. असे केल्याने विशिष्ट वर्गाचा किंवा विशिष्ट ग्रंथकाराचा ग्रंथसंग्रह एकत्र होऊन साहित्याच्या भक्तास भाषेचे, भाषेतील ग्रंथसंग्रहाचे व भाषेतील ग्रंथकारांचे मार्मिक ज्ञान मिळविण्यास सोपे जाते. अशा वर्गीकरण पद्धती(classification scheme) प्रमाणे ग्रंथ सुव्यवस्थित ठेविल्यावर ग्रंथांची, ग्रंथकाराची, त्यातील विषयांची संपूर्ण माहिती देणारा 'कॅटलॉग' किंवा ग्रंथांची 'वर्णनात्मक यादी' तयार करणे हे पुस्तकालयाचे महत्त्वाचे व अगत्याचे कार्य आहे. अशा शास्त्रीय कॅटलॉगांची आपल्या देशी भाषांत जितकी उणीव आहे तितकीच किंबहुना जास्तच त्याची आवश्यकता आहे. आजपर्यंतच्या महाराष्ट्रीय ग्रंथकारांबद्दल माहिती देणाऱ्या ग्रंथकारांचा कोश कोठे आहे ? तसेच निरनिराळ्या ग्रंथविषयांची संकलित माहिती देण्याचे साधन आपल्या जवळ आहे काय ? अर्थात खेदाने नाहीच म्हणावे लागते. ईश्वराच्या अघटित योजनेमुळेच पश्चिमेस पुस्तकालयविषयक ज्ञानसूर्याचा उदय होऊन आम्हा पौर्वात्यांस त्याचा काहीसा प्रकाश मिळू लागला आहे. आपणास आपल्याच पण अंधारामध्ये अदृश्य असलेल्या अनेक वस्तू दिसू लागल्या आहेत. अशा तऱ्हेचे कॅटलॉग वारंवार प्रसिद्ध झाल्याने भाषेतील ग्रंथसंख्येची माहिती मिळून त्या भाषेची खरी स्थिति समजते. असे कॅटलॉग भाषेत कशा प्रकारच्या ग्रंथांची उणीव आहे ती भासवून तज्ज्ञ ग्रंथकारांस वेळीच स्वकर्तव्याची दिशा दाखवितात. कॅटलॉगाचे योगाने निरनिराळ्या काळांतील वाङ्मयाच्या प्रगतीचे ज्ञान होते; असे कॅटलॉग भाषेचे जीवंत इतिहास होत. ह्या कॅटलॉगाची इतकी महती सांगतांना ग्रंथसंग्रहातील ग्रंथाच्या नुसत्या विषयवार यादीहून हे भिन्न आहेत हे सांगण्याची आवश्यकता नाही. ह्या आधुनिक शास्त्रीय कॅटलॉगावरून एकसमयावच्छेदाने ग्रंथांचे साद्यंत ज्ञान होते. ह्या कॅटलॉगाचे महत्त्व स्वत:चे मनोरंजनासाठी पुस्तके वाचणारापासून ते भाषाशास्त्राचा किंवा कोणत्याही विषयाचा अभ्यास करणारापावेतो सर्वांसच आहे. ह्या कॅटलॉगाचे मदतीने केवढेही भव्य किंवा विस्ताराचे

पुस्तकालय असो त्यातील पुस्तकांची माहिती वाचकांस अल्पावकाशात व अल्पश्रमाने मिळते. साहित्यसेवकांस अशा साधनांच्या योगाने ग्रंथांचे सर्व बाजूंनी निरीक्षण करता येते.

अशा प्रकारच्या पुस्तकांचा सर्वांगपरिपूर्ण शास्त्रीय कॅटलॉग तयार झाल्यावर पुस्तकालयासंबंधी इतर आवश्यक अंगांकडे पुस्तकालयातील अधिकारीवर्गाचे लक्ष गेले पाहिजे. पुस्तकांची नुसती आवड म्हणून त्यांचा सुव्यवस्थित संग्रह करणे हेच केवळ पुस्तकालयांचे अंतिम कार्य नव्हे; हे कार्य हौशी गृहस्थांचे आहे. पुस्तकालयांतील पुस्तकांचे अस्तित्व कपाटांत राहून त्यांस निवळ शोभा देण्याकरिता नव्हे. बुभुक्षित वाचकयाचकांस पुस्तकालयरूपी अन्नछत्रातील ज्ञानदानाने तृप्त करणे हे पुस्तकालयांचे आदि कर्तव्यापैकी एक आहे. ह्यासाठी प्रत्येक पुस्तकालय हे 'ज्ञानाचे सदावर्त' बनले पाहिजे; त्यांची स्थापना चोहोंकडे झाली पाहिजे. अशा ज्ञानाच्या अन्नछत्रात अर्थात ज्ञानदान मोफतच लाभले पाहिजे. परिस्थितीस अनुसरून पुस्तकालयांतील पुस्तके वापरणारांस कमीअधिक सवलती असू शकतील; तरी पण वाचकांस जितक्या शक्य असतील तितक्याअधिक सवलती देऊन पुस्तके वापरू देण्याकडे आधुनिक पुस्तकालयांचा कल असावा. इतकेच नव्हे तर 'वाचकास पुस्तक' व 'पुस्तकास वाचक' ह्या अमेरिकन गुरुमंत्राचा उपदेश घेऊन वाचकांस ज्ञानरूपी मोक्षाप्रत पोहचविण्यास प्रत्येक पुस्तकालयाने झटले पाहिजे. पुस्तकालयांतील कार्यकारी वर्गाने वाचकपुस्तकांचा सुसंयोग घडवून आणणारे योग वारंवार आणिले पाहिजेत. वाचक पुस्तकांकडे येण्याजोगे परिपक्व नसतील तर वाचकाकडेच फिरती पुस्तकालये पाठवून वाचकवर्गांत जिज्ञासा उत्पन्न करणे हेही काम पुस्तकालयांचे आहे. सारांश, वाचक-पुस्तक-एकीकरणाचा योग हा ह्या ज्ञानविद्यालयांतील पहिला धडा आहे. हा धडा प्रत्येक पुस्तकालयाने गिरविलाच पाहिजे.

येथपर्यंतची सर्व कार्ये पुस्तकालयाच्या योग्य मर्यादेतील आहेत. यापुढे निवेदिलेले कार्य पुस्तकालयाने हाती घ्यावे की काय ह्याबद्दल बराच मतभेद आहे; हे कार्य म्हणजे 'लोकाभिरुचीस वळण लावण्याचे'. लोकाभिरुचीस अयोग्य वळण लागण्याबद्दल पुस्तकालये किती जबाबदार आहेत याबद्दल निश्चयात्मक सांगता येत नाही. काही पुस्तकालये जर वाचकांचे मतस्वातंत्र्यावर घाला घालण्यास तयार नसतील, तर काही लोकशिक्षणाचे काम मोठ्या हौसेने पत्करणारी आढळतील. सर्वसाधारण लोकाभिरुची काय आहे हे प्रत्येक पुस्तकालयास सांगता येईल. कदाचित ह्याच्याही योगाने सुज्ञ जनसमाजास बराच बोध होईल व अप्रत्यक्ष रितीने लोकांस योग्य विषयांची अभिरुची लागेल; पण लोकशिक्षणाचेच कार्य प्रत्यक्ष रितीने पुस्तकालयाने घेतले तर बहुजनवाचकवर्गास ते कदाचित रुचणार नाही, किंबहुना त्यांस जी पुस्तके हवी ती जर पुस्तकालयांत नसतील तर ते त्यापासून परावृत्त होण्याचा संभव आहे. तेव्हा वाचकवर्गाच्या नेतृत्वाचा अधिकार वापरण्यात पुस्तकालयांस आपल्या लोकप्रियतेस कदाचित् मुकावे लागेल. काहीही असो, ज्या अर्थी अगदी थोड्या खर्चात असंख्य बहुजनसमाजात पुस्तकांचा फैलाव पुस्तकालयांकडूनच होतो, त्याअर्थी कमीअधिक प्रमाणाने लोकाभिरुचीबद्दल पुस्तकालये जबाबदार गणण्यास काही हरकत नाही. ही जबाबदारी पूर्णपणे जाणून पुस्तकालयांतील अधिकारीवर्गासारख्या ज्ञानवैद्यांनी नुसते रोगाचे निदान करून स्वस्थ बसता कामा नये; तर औषधपथ्यपाण्याबद्दल योग्य सूचना देऊन



रोगाचा पूर्ण निस्तोष करणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

वाचकवर्गाच्या या शास्त्यांचे ज्याप्रमाणे वाचनप्रवृत्तीचा ओघ बदलणे हे कर्तव्य आहे त्याचप्रमाणे ग्रंथकारांच्या लेखणीस आळा घालणे हेही त्यांचे तदनुगामी कर्तव्य आहे. हे कर्तव्य कदाचित पुस्तकालयाच्या योग्य मर्यादेबाहेरचे असे वाटण्याचा संभव आहे; तरी पण ग्रंथालयांत कोणत्या ग्रंथाची उणीव विशेष, कोणाच्या ग्रंथाकडे लोकप्रवृत्ती विशेष; इतकेच नव्हे तर भाषासमूहांत कोणत्या विषयांवर ग्रंथसंग्रह कमी आहे. ह्याचे उत्तर पुस्तकालयाचा कार्यकारी वर्ग जितके योग्य देऊ शकेल तितके दुसरे कोणासही देता येणार नाही. पुस्तकाच्या गुणदोषविवेचनात्मक याद्या वाचकांचे लक्ष पुस्तकांकडे विशेष रितीने आकर्षून घेतात. अशा यादी वारंवार प्रसिद्ध करून वाचकवर्गापुढे स्वादिष्ट पक्वान्न ठेविण्याचे कामी पुस्तकालयांतील मंडळीने सुगृहिणीचेच अनुकरण केले पाहिजे. ग्रंथांचा प्रसार पुस्तकालयेच जितक्या जास्त रितीने करू शकतात त्याहून कोणत्याही अन्य साधनांनी तो होत नाही. लोकप्रिय पुस्तकालयांत आपली पुस्तके ठेवणे हेच त्या पुस्तकांची जाहिरात देण्याचे उत्तम साधन होय. ग्रंथांचे वारंवार प्रसिद्ध होणारे गुणदोष-विवेचन हे ग्रंथांच्या प्रकाशनाचा मार्ग कुंठित करीत नसून उलट चांगले ग्रंथ निर्माण करण्यास ते उत्तम साधन होते. मार्मिक टीकाकार हे ग्रंथकारांचे शत्रू तर नाहीतच; पण ते ग्रंथकारांचे उत्तम मित्र आहेत. त्यांच्या कसोटीस उतरून जे जे टिकतात तेच खरे ग्रंथकार होत, नाहीतर अशा ग्रंथकारांचा उपजताच मृत्यू झाला तर त्याबद्दल खेद मानण्याचे कारण नाही. मार्मिक व योग्य मर्यादा न उल्लंघणारे टीकाकार होतकरू ग्रंथकारांच्या हुरूपास दाबून टाकीत नाहीत, उलट दूषित विचारांच्या वाङ्मयास आळा घालण्यास त्यांची फार मदत होते. अशा आक्षेपार्ह वाङ्मयाचा प्रसार समाजात होणे अत्यंत धोक्याचे आहे व तो न होऊ देणे हे कर्तव्य प्रत्येक पुस्तकालयाचे आहे; इतकेच नव्हे तर हे समाजातील प्रत्येक व्यक्तीचेही आद्य कर्तव्य आहे.

'ग्रंथांचा संग्रह' पुस्तकालयात असणे हे ज्याप्रमाणे जरुरीचे आहे त्याचप्रमाणे निरनिराळ्या प्रदेशांतील भिन्नभिन्न मतांच्या भिन्नभिन्न परिस्थितीतील बाल, युवा, स्त्री व वृद्ध या प्रत्येकास उपयोगी पडणारा वृत्तपत्रे व मासिके यांचाही संग्रह असणे अत्यंत जरुरीचे आहे. ह्या पुस्तकालयाचे शाखेस 'वाचनालय' अशी संज्ञा आहे. ही वाचनालये समाजातील प्रत्येक समाजघटकास त्याच्या निरनिराळ्या दुष्प्रवृत्तींपासून परावृत्त करून समाजामध्ये एका अत्युत्तम प्रवृत्तीस चालना देतात. वृत्तपत्रांतील वाङ्मय समाजघटणेस किती उपयोगी पडते हे आता नव्याने सांगण्याची जरूर नाही. लोकमत बनण्यास बऱ्याच अंशी समाजातील वाङ्मय उपयोगी पडते. वाङ्मय सुधारून वाचनालयाच्या मदतीने त्याचा प्रसार करणे हे पुस्तकालयाचे एक कार्य आहे. इतकेच नव्हे तर अन्य भाषांतील वृत्तपत्रांतील वाङ्मय ते न वाचणाऱ्या आपल्या बंधूपुढे स्वभाषेत ठेवणे हेही पुस्तकालयांतील कार्यकारी वर्गाचे कर्तव्य आहे. वाचनालयाचे हे कार्य जसे साधारण वाचकाच्या उपयोगी पडेल, तसेच विशिष्ट विषयांवर अभ्यास करणारांस जुन्या वृत्तपत्रांतून माहिती देण्याची पूर्वतयारीही वाचनालयाने केली पाहिजे. ह्यासाठी वाचनालयांत जुन्या वर्तमानपत्रांचा संग्रह व तो शक्य नसेल तर निरनिराळ्या वेळी वृत्तपत्रांतून कापून घेतलेल्या निरनिराळ्या विषयांवरील उताऱ्यांची पुस्तके वाचनालयांत असणे अत्यंत जरुरीचे आहे. ह्या वृत्तपत्रांतील उताऱ्यांच्या संग्रहाची विषयवार यादी असणे हेही तितकेच जरुरीचे आहे.

याशिवाय पुस्तकालयात हाती घेण्याजोगी दुसरी पुष्कळ कार्ये आहेत. याचा नुसता नामनिर्देशच या लेखात करणे शक्य आहे. पुस्तकालयात चलत्‌चित्रदर्शनात्मक यंत्रे ठेवून त्यांचा उपयोग लोकशिक्षणाकडे करणे, पुस्तकालयात लोकरंजन करून लोकशिक्षणाची साधने ठेवणे, अंधांसाठी पुस्तकालयांच्या शाखा उघडणे, बालवाचकांस निरनिराळ्या उपदेशात्मक व माहितीने भरलेल्या गोष्टी सांगून ज्ञानाचा प्रसार करणे, वगैरे पुस्तकालयांची अनेक कार्ये आहेत.

जनसमाजास शिक्षण देणे हे प्रत्येक समाजबांधवाचे कर्तव्य आहे. हल्ली आपण प्रगतीच्या युगात वास करीत आहोत, तेव्हा आपली प्रगती आपण करून घेतली पाहिजे. तेव्हा जनसमाजास शिक्षण देणाऱ्या प्रत्येक साधनाचा आपणास उपयोग करून घेतला पाहिजे. सर्वसाधारण जनसमूहास सारख्याच रितीने अव्याहत शिक्षण देण्याचे काम पुस्तकालय करू शकते. पुस्तकालयास लोकशिक्षणाचे काम जितके सुलभ रितीने साधता येते तितके दुसऱ्या कोणासही ते साधणार नाही. या ज्ञानमाऊलीपासून अखंड वाहणाऱ्या ज्ञानदुग्धामृताचे अखंड पान तिच्या सर्व लेकरांकरिता सारखे राखून ठेविले आहे. ती ज्ञानमाऊली विश्वविद्यालयाप्रमाणे सर्व जनसमाजाची जगज्जननी (Alma mater) आहे; म्हणूनच 'लायब्ररी मिसलेनीचे' 'The Public Library is the People's University' हे धर्मवाक्य आहे ते यथार्थ आहे.

❑❑❑



# पत्रव्यवहार : एक

## पत्र १

श्री. प्रदीप कर्णिक कार्यकारी संपादक, ज्ञानगंगोत्री यास,

स.न.वि.वि. ज्ञानगंगोत्रीचा दाते जन्मशताब्दी विशेषांक मिळाला व मला आश्चर्याचा धक्का बसला. असे वाटले नानांची जन्मशताब्दी एवढ्यात आली पण आणि आपल्याला पत्ता पण नाही !

एक एक वर्ष जात होते आणि अशक्य वाटणाऱ्या गोष्टी हळूहळू शक्य होत गेल्या. ग्रंथसूचीचे पुनर्मुद्रण होईल असे स्वप्नातही वाटले नव्हते. पण १९९० साल उजाडले व एक दिवस श्री. शरद गोगटे (शुभदा सारस्वत प्रकाशनचे) यांचे पत्र आले. आम्हाला सूचीच्या पुनर्मुद्रणात रस आहे. हा आश्चर्याचा पहिला धक्का. काही कारणाने आमचे एकमत होऊ न शकल्याने त्या वेळी ती प्रसिद्ध होऊ शकली नाही. नंतर इ.स. २०००च्या सुमारास डॉ. सरोजिनी वैद्य यांच्याकडून प्रस्ताव आला. त्यांनी सर्व अटी मान्य केल्याने अॅग्रीमेंट होऊन सूची पुनर्मुद्रित झाली. त्यानंतर हा जन्मशताब्दीचा धक्का हेही अशक्य वाटणारेच.

आपला अंक आला तेव्हा मी नुकताच इंग्लंडहून परत आलो होतो व बरेच प्रश्न तुंबलेले होते, ते सोडविण्यात वेळ गेला व मला स्वास्थ्य नव्हते. आपला अंक सुरुवातीला थोडा वाचला; पण नंतर सौ. नी तो जो दडवून ठेवला तो बऱ्याच दिवसांनी मला पाहावयास मिळाला. आता तो अंक जसजसा वाचत जाईल तसतसा माझ्या प्रतिक्रिया पाठवत जाईल. अर्थात मी वाङ्‌मयीन किंवा ग्रंथालयीन क्षेत्रातील नसल्यामुळे त्या common sense वर, सारासार विचारावर आधारलेल्या असतील.

संपादकीयमध्ये ग्रंथसूचीच्या मर्यादा यात सूचीत वर्तमानपत्रे, साप्ताहिके यांचा समावेश नाही असा उल्लेख आहे. ज्याअर्थी दाते यांनी १९५० पर्यंतच्या ग्रंथसूचीचे काम झाल्यावर ते तेथेच थांबविले व मासिक सूची हातात घेतली त्याअर्थी त्यांना या सूचींची जाणीव असणारच. पण प्रत्येक गोष्टीला काही मर्यादा घालून घेतल्या पाहिजेत ना ? दाते यांनी पुस्तक पाहिल्याशिवाय नोंद करावयाची नाही असा नियम केला. त्याला दुसऱ्याही एका दृष्टीने महत्त्व आहे ते म्हणजे ग्रंथाची उपलब्धी. पुस्तक पाहून नोंद केली म्हणजे त्या वेळी त्या ग्रंथाची एकतरी प्रत उपलब्ध आहे हे सिद्ध होते. वर्तमानपत्रे, मासिके ही निकृष्ट कागदावर छापली जातात. टिकाऊपणा हे या प्रकाशनांचे उद्दिष्ट नसते. २०/३० वर्षांत त्यांचा भुगा होऊ लागतो. मग त्या सूचीचा उपयोग काय ? १९५०-८० ची नियतकालिक सूची तयार असली तरी २००५ पर्यंत अजून पूर्ण प्रसिद्ध झालेली नाही. म्हणजे यातील मासिके २५-५५ वर्षांची जुनी झाली. त्यांची स्थिती काय असणार ? यावरून गतिमान सूचीकरणही किती महत्त्वाचे आहे हे स्पष्ट व्हावे. उपलब्धी हा सूचीचा महत्त्वाचा निकष असावा.

याच संपादकीयात ललित वाङ्मयाचा समावेश (नियतकालिक) सूचीत नाही असा उल्लेख आहे. तो वाचूनही आश्चर्य वाटते. कारण मी जेव्हा दातेसूचिमंडळात होतो (आताही असावयास हवा) तेव्हा १९७० च्या सुमारास असे ठरले होते की लेख निवडण्यात वेळ खूप जातो तेव्हा सरसकट सर्व लेखांची सूची करावी मग त्यांत हे साहित्य कसे नाही ?

पृ. ७८ वर शेवटच्या परिच्छेदात पंचारतीतून घेतलेले दाते यांचे काही उद्गार उद्धृत केलेले आहेत. ते कदाचित पुण्यातील शासकीय महाराष्ट्र ग्रंथालयाबद्दल असावेत. मुं.म. ग्रंथसंग्रहालयाबद्दल नाही असे त्या उद्गारावरून वाटते. १९४५ साली मु.म. ग्रंथसंग्रहालयाला १०४ वर्षे कुठे झाली होती ?

एकंदरीत पहिले जे थोडेसे वाचन झाले त्यावरून लेख नि:पक्षपातीपणे लिहिलेले आहेत असे वाटते. उगीच भरमसाठ स्तुती नाही. चुका दाखवून दिल्यात. तसेच सूचीवरही बरेच संशोधन झालेले आहे हेही कळले.

असो आपण हा अंक प्रसिद्ध केलात याबद्दल आभार ! पत्रास उशीर झाला त्याबद्दल क्षमस्व. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचेही आभार !

दिवाळीबद्दल सर्वांस शुभेच्छा !

(अजूनही पत्रे येत राहतील.)

सु.शं. दाते
१७५/४८८७ पंतनगर, घाटकोपर पूर्व
मुंबई ४०००७५

## पत्र २

श्री. प्रदीप कर्णिक,कार्यकारी संपादक, ज्ञानगंगोत्री यास,

स.न.वि.वि. माझे मागचे पत्र मिळालेच असेल. आता इतर मुद्यांकडे वळण्यापूर्वी श्री. डोंगरे यांच्या लेखातील पुनर्मुद्रणाबद्दल मूल्यमापन यातील एका वाक्याकडे वळतो. त्यात असे म्हटले आहे, ''या पुनर्मुद्रणात रा.म.वि. संस्थेने काही वेगळी वाट वापरली आहे असे दिसत नाही.'' याला जबाबदार मीच आहे. कारण पुनर्मुद्रणास परवानगी देताना ग्रंथात काही फेरफार करावयाचे नाहीत ही अट मी घातली होती. ती संस्थेने मान्य केल्याने पुनर्मुद्रण शक्य झाले. ग्रंथात थोडाही फरक केला की श्रेयाची(credit) वाटणी सुरू होते. दाते यांची सूची तिच्यातील गुणदोषांसह जशीच्या तशीच प्रसिद्ध व्हावी ही माझी इच्छा होती. सूचीवर खण्ड १, खण्ड २ असे संस्थेने घातले त्यासही मी विरोध केलेला आहे. श्री. साठे यांच्या सूचीवर खण्ड ३ लिहिल्यावर ''वरच्या'' कुणाच्या तरी Direction खाली या ३ सूची झाल्या असा अर्थ होतो. तो खरा नाही. श्री साठे यांनी स्वत:ची काही वेगळी सूत्रे पाळली आहेत.

सूचींच्या पुनर्मुद्रणात फेरबदल न केल्याने एक फायदा असा झाला की पुनर्मुद्रण scanning पद्धतीने करता आले. त्यामुळे खर्च बराच कमी झाला. तसे केले नसते तर ग्रंथाची किंमत वाढली असती.



मूळ ग्रंथकर्त्याच्या कामात फेरबदल केल्यास रॉयल्टीच्या बाबतीतही प्रश्न उद्भवू शकतात. ग्रंथातील हे तुमचे, ही भर आम्ही घातली इत्यादी. नियतकालिकांच्या सूचीबाबत हा अनुभव आला.

ज्या वेगवेगळ्या प्रकारच्या सूचींची लोकांची अपेक्षा / गरजा आहे त्यांची यादी वाचून मी थक्क झालो व या लोकांची कीव वाटू लागली. मूळ Basic सूची तयार असताना त्यांच्यातून पाहिजे ती माहिती शोधण्याचे श्रमही लोकांना घ्यावयाचे नाहीत. या लोकांनी सूची कॉम्प्युटरवर टाकावी म्हणजे त्यांना पाहिजे तसे वर्गीकरण एक बटण दाबून मिळू शकेल.

सूचीच्या किमतीबद्दल मी असे म्हणतो की १९४४ साली जेव्हा पहिला खण्ड प्रसिद्ध झाला तेव्हा त्याची किंमत ६० रु. होती व तेव्हा सोन्याचा भाव ४०/४५ रु. तोळा होता. म्हणजे किंमत जवळजवळ दीड तोळा सोन्याएवढी होती. १९६१ साली दुसरा खण्ड प्रसिद्ध झाला. त्याचीही किंमत ६० रु. होती व सोन्याचा भावही ६० रु. तोळा असावा. म्हणजे दोन्ही खण्डांची किंमत अडीच तोळे सोन्याएवढी होती. आता सोन्याचा भाव ७००० रुपयांपर्यंत गेला आहे व सूची २६०० रु. मिळत आहे. म्हणजे अर्ध्या तोळ्याच्या किमतीत. म्हणजे ही किंमत Throw Away प्राइस नाही का ? तरीही डॉ. सरोजिनी वैद्य यांनी माझ्याकडून आणखी concession १०० प्रतींसाठी मागून घेतलेच.

अंकात बऱ्याच ठिकाणी ड्यूएची १४ वी आवृत्ती, १९ वी आवृत्ती यांचा उल्लेख आढळतो. दाते यांच्या २/३ प्रमुख गुणांतील एक म्हणजे त्यांचा स्वतंत्र बाणा. त्यांनी ड्यूएची वर्गीकरण पद्धती स्वीकारली याचा अर्थ असा नाही की ड्यूएच्या प्रत्येक आवृत्तीबरोबर ते आपली पद्धती बदलत गेले असते. त्यांनी आपली वर्गीकरणाची सारणी सूचीत छापली याचा अर्थ तोच आहे की ते फक्त या सारणीस बांधील आहेत.

असो. पण या टीकेवरून आपण अजूनही पश्चिमाभिमुख आहोत व पुस्तकी पंडित आहोत असे वाटते. १९ व्या आवृत्तीत आपल्यावर परिणाम करणारे कोणते फरक आहेत हे कोणी दाखविले असते तर बरे झाले असते. आपल्याकडची ग्रंथनिर्मिती कोणत्या प्रकारची आहे हे लक्षात घेऊन वर्गीकरणात फेरबदल केले पाहिजेत. कॉम्प्युटरवरच फक्त कॉम्प्युटरची ओळख, कॉम्प्युटरशी मैत्री अशासारखी ५/१० पुस्तके निघत असतील तर ती सर्व फक्त 'कॉम्प्युटर अशा एकाच वर्गांकात ठेवण्यास हरकत नाही. त्यासाठी Analog computer, Digital computer, Microprocesser अशा उपविभागांची आवश्यकता सध्या नाही. आपणास सूचीचे जागतिकीकरण करावयाचे नाही आहे.

डॉ. नीला देशपांडे यांनी केलेल्या सूचीच्या मूल्यमापनात (पृ.२५) असा मुद्दा आला आहे की ग्रंथांचा आकार इंचात दिला आहे सेंटिमीटरमध्ये नाही. यांचे सोपे स्पष्टीकरण असे की सूचीचा पहिला खण्ड १९४४ साली प्रसिद्ध झाला तेव्हा ब्रिटिशांचेच राज्य होते व त्यांची FPS (Foot, Pound, Second) पद्धत अमलात होती. मेट्रिक पद्धत स्वातंत्र्यानंतर कायद्याने अमलात आली तेव्हा हा मुद्दा फार तर सूचीच्या दुसऱ्या खण्डास लागू पडेल. मेट्रिक सिस्टीम

रुजण्यासही बरीच वर्षे लागली. दुसरीही एक गोष्ट लक्षात घ्यावयास पाहिजे की मुद्रण व्यवसायात ग्रंथांच्या आकारास डेमी, क्राऊन, इत्यादी संज्ञा आहेत. त्या दाते यांनी न वापरता सरळ इंचात आकार दिले. त्यामुळे संशोधकांचे संज्ञाचे अर्थ शोधण्याचे श्रम वाचले ही खरी कौतुकाची गोष्ट.

डॉ. देशपांडे यांनी ग्रंथविषयक प्रमाणकासाठी IS-2381-1963 चा आधार घेतला आहे. हे प्रमाणक १९६३ चे असावे तेव्हा या सालापूर्वी प्रसिद्ध झालेल्या दोन्ही ग्रंथसूचींना हा मानक लागू करणे योग्य होणार नाही. जरी सूची त्या मानकाप्रमाणे आहे.

पृ. २९ वरील श्री दण्डवते यांचे सूचीवरील परीक्षण वाचून मी कपाळाला हातच लावला. पण नंतर श्री. डोंगरे यांनी केलेले यातील बऱ्याचशा आरोपांचे खण्डन वाचून बरे वाटले.

दण्डवते यांचा एक आरोप असा आहे की दाते यांनी अनेक ग्रंथांत आवश्यकता असूनही टिप्पणी दिलेली नाही. त्याचे एक कारण असेही असू शकेल की त्या काळात ती पुस्तके इतकी प्रसिद्ध होती की त्यांना टिप्पणी देण्याची दात्यांना आवश्यकता वाटली नसेल. अर्थात हा माझा तर्क. कदाचित 'रागिणी' ही कादंबरी जिचा उल्लेख अंकात आला आहे ते याचे उदाहरण असू शकेल.

पृ. ३७ वर श्री. डोंगरे यांच्या लेखात सूचीमधील त्रुटी यामध्ये महाराष्ट्रीय वाङ्मय सूची १८००-१९१७ त्या काळी उपलब्ध होती याचा उल्लेख केला आहे. ती सूची मी पाहिलेली नाही, पण ती जर त्यांच्या दात्यांच्या अपेक्षेप्रमाणे असती तर डोंगरे म्हणतात त्याप्रमाणे दात्यांना शोधाशोध करावी लागली नसती. व त्यांनी ती केलीही नसती. पण त्यांना नंतर त्यांच्या सूचीत याचा उल्लेख करावा लागला असता की १८०० ते १९१७ च्या नोंदी ही महाराष्ट्रीय वाङ्मयसूचीची कॉपी आहे, तसेच त्या सूचीचा फक्त निर्देश खण्ड वेगळा तयार करून छापणे चमत्कारिक झाले असते.

असो. माझे हे या अंकाबद्दल Laymans (सामान्य माणसाचे) विचार आहेत. काही प्रस्थापित विचारांच्या विरोधीही असतील पण त्यास इलाज नाही. आपण हा अंक प्रसिद्ध केलात त्याबद्दल पुन्हा एकदा आपले आभार मानून हे पत्र संपवितो.क. लो.अ. हे. वि.

या अंकावर नंतर काही पत्रे आलेली असल्यास ती मी पाहिलेली नाहीत. त्यात वरीलपैकी काही मुद्दे कदाचित आधीच येऊन गेले असतील.

**– सु. शं. दाते**

## पत्र ३

श्री. प्रदीप कर्णिक, कार्यकारी संपादक, ज्ञानगंगोत्री यांस –

स.न.वि.वि. माझी मागील दोन पत्रे मी जरा घाईत लिहिली. त्यांत काटेकोरपणाचा विचार जास्त केला नाही.

मागच्या पत्रात मी 'पुनर्मुद्रणात रा.म.वि. संस्थेने काही वेगळी वाट वापरली आहे असे दिसत नाही.' यावर लिहिले होते. ते लिहीत असतानाही 'वेगळी वाट' म्हणजे कोणती वाट ?



याबद्दल शंका वाटत होती; त्यामुळे त्या वाक्यामागील मजकूर वाचून पाहिला. पण त्यातही काही उत्तर मिळाले नाही. म्हणून मी जास्त विचार न करता मला जो अर्थ वाटला त्यानुसार माझे मत लिहिले. आता पुन्हा वाचत असताना त्या वाक्याच्या नंतरच्या मजकुरात थोडेफार उत्तर मिळते. परंतु श्री. डोंगरे यांच्याकडूनही स्पष्ट उत्तराची अपेक्षा आहे.

तसेच माझा नियतकालिके व वृत्तपत्रांच्या टिकाऊपणाबद्दलचा मुद्दाही 'ग्रंथपरिचय' या लेखात पृ. ७३ वर आला आहे. फक्त आमच्या विचारांत भिन्नता आहे.

रागिणी कादंबरीबद्दलचा उल्लेखही मी सूचीची प्रत मुंबईस नसल्यामुळे मी तपासून पाहू शकलो नाही. टिप्पणीबद्दल बोलावयाचे झाले तर तशा प्रकारची एक वेगळी सूचीच बनवावी लागेल. मराठीत अशा प्रकारचे ग्रंथ आहेत असे वाटते. जे सूचिरूप नसले तरी वाङ्मयाचा परामर्श घेणारे आहेत. इंग्रजीत पुस्तकांचे ८/१० ओळींत सारांश देणारे ग्रंथ मी पाहिले आहेत.

साठे यांच्या सूचीस खण्ड ३ म्हटल्याबद्दल मी आक्षेप घेतला हे चमत्कारिक वाटेल; पण माझे म्हणणे अधिक स्पष्ट होण्यासाठी असा विचार करा की दाते यांनी आपल्या सूचीत ''महाराष्ट्रीय वाङ्मय सूची खंड xxx'' असे नाव दिले असते तर कसे झाले असते ? सूचीचा पहिला भाग प्रसिद्ध झाला तेव्हा दात्यांना हे निश्चितपणे सांगता आले नसते की सूचीचा दुसरा भाग निघेल की नाही. सरकारच्या मदतीशिवाय ते शक्यच झाले नसते. यामुळे दात्यांनी या सूचीला भाग १-२ दिलेले नाही असे वाटते. फक्त १८००-१९३७ च्या सूचीतील वर्णनकोशाला खण्ड १ व संदर्भकोशाला खण्ड २ म्हटले आहे असे वाटते. १८००-१९३७ व १९३८-५० हीच या सूचींची ओळख होय (Identity). साठ्यांच्याही सूचीला १९५१-६२ ही ओळख पुरी पडली असती.

पृ. ३९ वर श्री. श्री. बा. जोशी यांची पुस्तकाच्या किमतीतील सवलतीबाबतच्या दाते यांच्या उत्तराची आठवण आहे. ज्या वेळी आर्थिक परिस्थिती फारच बिकट झाली होती त्या वेळी श्री. दाते यांनी सूची २० रु. भावाने पण विकली होती. किंमत त्यापेक्षा खाली नेण्यास मात्र त्यांचा विरोध होता व त्यापेक्षा प्रती रस्त्यात जाळीन असे ते म्हणाले होते. वितरक फायदा घेतात याच्याशी त्याचा संबंध नव्हता. श्री. जोशी यांनी स्वत:साठी सवलत मागितली असती तर कदाचित त्यांनी दिली असती.

वरील सर्व लिहीत असताना माझे आपल्या स्वत:च्या 'शं.ग. दाते – व्यक्ति आणि कार्य' या लेखाकडे दुर्लक्ष झाले असे वाटण्याचा संभव आहे. पण तसे नाही. तो लेख मी सुरुवातीस वाचला होता. तो खूप चांगला व माहितीपूर्ण होता. त्यात काही मला माहीत नसलेली पण माहिती होती. असे लेख वाचले की वाटते लोकांना आपल्याबद्दल आपल्याला वाटते त्यापेक्षा बरीच जास्त माहिती असते.

लेखाच्या शेवटी आपण दाते यांची सारणी व सूचिमंडळाची सारणी यांचे एकत्रीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे हे वाचून फार बरे वाटले 'असे केले पाहिजे, तसे केले पाहिजे' असे उल्लेख अंकात जागोजागी आढळले; पण मी हे करणार आहे असा उल्लेख कुठेच आढळला

नाही. त्यामुळे यास महत्त्व. जे लोक काम प्रत्यक्ष हातांत घेतात त्यांच्याबद्दलच आदर वाटतो.

माझ्या मागच्या पत्रात मी म्हटले होते की, 'श्री. साठे यांनी आपल्या सूचीसाठी काही वेगळी सूत्रे वापरली आहेत' हे विधान मी कोठेतरी वाचले होते, त्याच्या आधारावर व भीतभीतच केले होते. पण त्यास पुरावा आपल्या लेखात पृ. ११ वर मिळाला. ''(सारणीची) अस्सल देशी व त्यातही बावन्ननंबरी मराठी आवृत्ती दाते यांनी १९४४ सालीच महाराष्ट्राला पेश केली होती याकडे मात्र श्री. साठे यांचे दुर्लक्ष झालेले आहे.'' हा तो पुरावा. तो वाचून आश्चर्य वाटते.

पृ. ११ वर आपण म्हटले आहे की १९४४ साली ''त्यांना वर्गीकरण शिकवणारी कोणी व्यक्ती नव्हती. पुस्तके वाचून त्यांनी वर्गीकरणाचा एकलव्याच्या पद्धतीने अभ्यास केला.'' असा अभ्यास त्यांनी केला असणारच. पण वर्गीकरणात त्यांचे प्रश्न सोडविणारे एक सल्लागार होते ते म्हणजे फार्ग्युसन कॉलेजच्या वाडिया लायब्ररीचे ग्रंथपाल श्री. र.शं. पारखी. सूचीत त्यांचा उल्लेख आला आहे व डॉ. सरोजिनीबाईंना पण मी उल्लेख करावयास सांगितले होते. मी बरेच वेळा वडिलांबरोबर त्यांच्याकडे जात असे. दात्यांवरील आपल्या व इतरही लेखांत एक नाव येत नाही ते म्हणजे त्या वेळेच्या मुंबई इलाख्याचे 'पंतप्रधान' श्री. बा. ग. खेर. त्यांच्याशी दात्यांच्या बराच पत्रव्यवहार चालू असे (ग्रंथालय चळवळीबद्दल) व त्यांच्याकडूनही दात्यांना प्रोत्साहन मिळत असे.

सूचीत उपलब्धिस्थळ देणे मला चुकीचे वाटते. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र असाच हा प्रकार. फक्त येथे हलवाई चांगला असतो एवढेच. ग्रंथपाल सूचिकारास पुस्तके पाहण्याची परवानगी देतो याचा अर्थ असा नव्हे की तो ती पुस्तके कायम जपून ठेवण्याची हमी देतो. जर कोणाला पुस्तकाच्या उपलब्धिस्थळाची माहिती पाहिजे असेल तर त्याने सूचिकाराशी संबंध/ संपर्क साधला पाहिजे; ज्याप्रमाणे दूरदर्शनवर ज्याची मुलाखत होते त्याचा फोन नंबर डायरेक्ट दिला जात नाही. दूरदर्शनला फोन करून तो मिळवावा लागतो.

पृ. १६ वर श्री. डोंगरे यांनी म्हटले आहे, की दाते सूचिकार्य उरकून त्यांच्या वाङ्मयीन लेखनाकडे वळू शकले असते. हो त्यांच्याजवळ प्रतिभा होती, शब्दसामर्थ्य होते. त्यांना शब्द सहज स्फुरत; पण ललितलेखनाकडे त्यांचा कल नव्हता. त्यांचा पिण्ड इतिहासकाराचा होता. सूची किंवा लोककथा हा त्याचाच आविष्कार होय. दुसरे असे, की ग्रंथसूची प्रसिद्ध करून त्यांना जे यश मिळाले त्यामुळे ते त्यातच पुढे कार्य करत राहिले.

शेवटी मला एवढेच सांगावेसे वाटते की, ''सूचिकारांनो इतकी माहिती पुरवू नका की ज्यामुळे संशोधक दुर्बळ बनतील व फक्त सूचीवर अवलंबून राहू लागतील.त्यांनाही थोडे काम करू द्या.'' क.लो.अ.हे.वि.

मागे मी विनोदाने म्हटले होते, पण आज मला खरोखरच सूची करण्याची स्फूर्ती आली आहे. कारण या कामातील काही पोकळ्या मला सापडल्या आहेत.

**– सु. शं. दाते**

❑❑❑



# पत्रव्यवहार : दोन

श्री. प्रदीप कर्णिक, कार्यकारी संपादक, ज्ञानगंगोत्री यांस,

स.न.वि.वि. 'ज्ञानगंगोत्री' चा ग्रंथमुद्रणकला विशेषांक वाचला. मराठी ग्रंथमुद्रणविषयक माहिती एकत्रपणे इतक्या विस्ताराने प्रथमच आलेली असल्याने आणि मुद्रणविषयक लेखांची सूची दिल्याने त्याचे संदर्भमूल्य वाढले आहे. अंक अतिशय संग्राह्य झाला आहे.

यातील साहित्याचे संदर्भमूल्य पाहता ग्रंथस्वरूपात तो प्रकाशित व्हावा असे तीव्रतेने वाटते. नियतकालिकाला पृष्ठसंख्येच्या, प्रकाशनकाळाच्या मर्यादा असतात, शिवाय कालांतराने असे अंक सहजी उलपब्ध होत नाहीत. त्या दृष्टीने पुस्तक झाले तर अधिक चांगले. असा काही विचार मनात आलाच तर काही सूचना करीत आहे.

(१) स्थित्यंतराचे निवडक टप्पे (पृष्ठ – ५) यात १९६८ पर्यंतचे टप्पे आलेले आहेत. २००५ पर्यंतचे टप्पे त्यात यावेत. ग्रंथमुद्रणावर ज्या क्षेत्राचा प्रभाव पडला (वृत्तपत्रे, मासिके) त्यांच्या मुद्रणविषयक विकासाचे टप्पे यांचाही त्यात समावेश असावा. लिपीचे संगणकीकरण, ऑफसेट, डिजिटल मुद्रणपद्धती या त्यात येतीलच.

(२) मार्शल मॅकलुहन यांच्यावरील लेख अपुरा वाटतो. 'गटेनबर्ग गॅलॅक्सी' व 'मीडियम इज द मेसेज' यात मुद्रणयुग आणि मुद्रणोत्तर दृश्यमाध्यमांचे युग यांची जी चर्चा आलेली आहे ती तपशीलवार यायला हवी. तरच मॅकलुहनचे वैचारिक योगदान कळेल.

(३) ग्रंथपरिचय मधील तीनही ग्रंथांचा परिचय योग्यच आहे. यात आणखी काही मराठी व इंग्रजी ग्रंथांचा समावेश करता येईल. (उदा. महत्त्वाचा संदर्भग्रंथ – 'A Mannual of style - for Authors, Editors, Copywriters, University of Chicago Press, Chicago & London)

(४) मुद्रणविषयक पारिभाषिक संज्ञा, संकल्पना या शब्दांच्या निवडीमागे काही सूत्र आढळत नाही. तसे ते असायला हवे आणि अधिक संज्ञांची भर घालयाला हवी. (उदा., CMYK ची नोंद असेल तर RGB, Colour Gamut यांच्याही नोंदी हव्यात.) Direct to Plate Printing (DPP) ला CTP - Computer to Plate ही संज्ञा अधिक रूढ आहे.

(५) मुद्रणक्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींचा परिचय देण्याची कल्पना सचिन गराटे यांच्या बोलण्यात आली होती. बहुधा वेळेच्या अभावामुळे ती अंकात आली नसावी. पण हा परिचय आवश्यक आहे.

(६) शिळामुद्रण (Lithography) बद्दल या अंकात फारशी माहिती नाही. चित्रशाळा किंवा राजा रविवर्मा यांच्याबद्दल काही माहिती असायला हवी.

(७) जयराज साळगावकर आणि अरुण नाईक यांचे लेख आजच्या काळातील मुद्रणाबद्दल असल्याने एक नवा दृष्टिकोन देणारे आहेत. र.कृ. जोशींचा लेख चांगला आहेच. फक्त त्यात मुद्राक्षररचनेचे नमुने देणेही तितकेच आवश्यक आहे.

(८) हे सर्व करताना आता लेखांमध्ये असलेली आणि नव्या मजकुरातही असेल अशी पुनरुक्ती टाळावी लागेल. त्या दृष्टीने लेखांचे पुन्हा एकदा संपादन करावे लागेल हे उघडच आहे.

(९) ग्रंथाचे Title page पासून (Preliminary Pages) ते Index पर्यंतचे सर्व भाग यादीच्या स्वरूपात कुठेतरी येणे आवश्यक वाटते.

आपण अतिशय परिश्रमपूर्वक इतका चांगला अंक काढला आहे त्याला अधिक चिरस्थायी रूप मिळावे म्हणून वरील गोष्टी सुचवल्या आहेत.

कळावे.

आपला,

**दीपक घारे**
४, शिवांजली पाथर्डी रोड
गोग्रासवाडी, डोंबिवली (पूर्व) - ४२१ २०१

❑❑❑



# ग्रंथालय माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम
# २००५-२००६
## प्रकल्प विषयांची यादी

### अभ्यासकेंद्र : नाशिक (सार्वजनिक वाचनालय)

| *अ.क्र.* | *प्रकल्प विषयाचे नाव* | *विद्यार्थ्याचे नाव* |
|---|---|---|
| ०१. | नाशिक शहरातील विधितज्ज्ञांच्या माहितीविषयक गरजांचा अभ्यास | अहिरे, ललिता राजाराम |
| ०२. | नाशिक शहरातील महाविद्यालयीन ग्रंथालयातील ग्रंथालय आज्ञावलींचा अभ्यास | आढाव, महेंद्र माधवराव |
| ०३. | महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगाव कॅम्प, जि. नाशिक संचालित माध्यमिक विद्यालयांच्या ग्रंथालयांचा अभ्यास | कदम, मनोहर पोपटराव |
| ०४. | नाशिक शहरातील शासनमान्य ब वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांचे सर्वेक्षण | कांगणे, विजय राजाराम |
| ०५. | नाशिक शहरातील भिकुसा यमासा क्षत्रिय वाणिज्य महाविद्यालयातील ग्रंथालयाचा अभ्यास | घुगे, सोनाली भाऊराव |
| ०६. | कोपरगाव तालुक्यातील माध्यमिक शालेय ग्रंथालयांच्या सद्य:स्थितीची पाहणी - एक अभ्यास | चतुर, सुर्यभान रामभाऊ |
| ०७. | 'मैत्रीच्या पलीकडे' या नियकालिकाचे आशय विश्लेषण | जगदेव, गजेंद्र सोमा |
| ०८. | 'अभिव्यक्ती : माध्यम चर्चेचे' मराठी त्रैमासिक आशय विश्लेषण | ठाकरे, भिला पंडित |
| ०९. | य.च.म. मुक्त विद्यापीठातील शिक्षकांच्या वाचन-सवयींचा अभ्यास | डुकरे, छाया शिवलाल |
| १०. | निफाड तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयीन ग्रंथालयाची पाहणी | ढिकले, कविता अंबादास |
| ११. | साहित्यसूची या नियतकालिकाचे आशय विश्लेषण | देवरे, मनोज रावसाहेब |
| १२. | श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम संचलित कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला व वाणिज्य महाविद्यालयातील ग्रंथालय : एक अभ्यास | देवरे, माधुरी जगन्नाथ |

| अ.क्र. | प्रकल्प विषयाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| १३. | धुळे जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे आशय विश्लेषण | देसाई, जयश्री भास्कर |
| १४. | 'भारतीय इतिहास आणि संस्कृती' या नियतकालिकातील उल्लेखांचे विश्लेषण | देसाई, भास्करराव रावसाहेब |
| १५. | 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' - आशय विश्लेषण | बच्छाव, वंदना कृष्णाजी |
| १६. | धुळे येथील श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे भाऊसाहेब ना.स. पाटील साहित्य महाविद्यालयातील ११ वी ते पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या वाचनसवयींचा अभ्यास | बागूल, नितू पोपटराव |
| १७. | महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे दंत महाविद्यालय, नाशिक ग्रंथालयातील वाचनासाहित्य संग्रहाचे मूल्यमापन | बिडकर, संगीता रवींद्र |
| १८. | सत्कार्योत्तेजक सभा मुक्तद्वार वाचनालय, धुळे - एक अभ्यास | रनाळकर, राजश्री सुरेशचंद्र |
| १९. | वनवासी माध्यमिक विद्यालय, चिंचपाडा येथील इ. १० वीच्या विद्यार्थ्यांच्या वाचन अभिरुचीचा अभ्यास | वसावे, नितीन भरत |
| २०. | नाशिक येथील कर्मवीर काकासाहेब वाघ महिला तंत्रनिकेतन विद्यार्थिनींच्या वाचनसवयीचा अभ्यास | शिंदे, शारदा धोंडीराम |
| २१. | 'योजना' नियतकालिकाचे आशय - विश्लेषण | शिंपी, विद्या केशव |
| २२. | धुळे शहरातील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयीन ग्रंथालयातील नियतकालिकांची संघतालिका | शिरसाट, किरणकुमार सुभाष |
| २३. | नाशिक शहरातील माध्यमिक शाळेत ग्रंथपालांच्या कार्यसमाधानाचा अभ्यास | सौंदाणकर, स्मिता अनिल |
| २४. | मालेगाव कॅम्प येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला वाणिज्य आणि विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची वाचन अभिरुची - एक अभ्यास | अहिरे, स्वाती |



| अ.क्र. | प्रकल्प विषयाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| २५. | शासकीय तंत्रनिकेतन, धुळे येथील ग्रंथालयाचा अभ्यास | पोळ, संगीता |
| २६. | इ. वि. का. राजवाडे इतिहास संशोधन मंडळ ग्रंथालय धुळे - एक अभ्यासक | अडावदकर, प्रशांत विष्णू |
| २७. | इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळाचे कै. भास्कर वामन तथा तात्यासाहेब भट स्मारक राजवाडे वस्तुसंग्रहालय धुळे - एक अभ्यास | शिंदे, प्रशांत खंडेराव |

## अभ्यासकेंद्र : सांगली (जी. ए. कॉलेज ऑफ कॉमर्स)

| | | |
|---|---|---|
| ०१. | इंडियन नॅशनल डिजिटल लायब्ररी इन इंजिनीअरिंग सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलाजीच्या सभासद तंत्रशिक्षण ग्रंथालयातील ई-जर्नल्सचा वापर. | इनामदार, रमेजा अब्दुलमजीद |
| ०२. | सांगली शहरातील इतर 'अ' वर्ग सार्वजनिक वाचनालयांचा तौलानिक अभ्यास | करसाळे, उज्ज्वला बंडू |
| ०३. | कोल्हापूर आकाशवाणी केंद्राच्या ग्रंथालयाचे माहिती प्रसारणातील योगदान | कामत, शिल्पा व्यंकटेश |
| ०४. | किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, ग्रंथालय अभ्यास | कुंभार, प्रमोदिनी अशोक |
| ०५. | नगर वाचनमंदिर, जयसिंगपूर ग्रंथालय : एक अभ्यास | कुगे, बाहुबली नरसू |
| ०६. | समाजवादी प्रबोधिनीद्वारा संचलित प्रबोधन वाचनालय, इचलकरंजी : एक अभ्यास | खांडेकर, गणेश बाजीराव |
| ०७. | सांगली शहरातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालयातील नियतकालिकांचे व्यवस्थापन | पलसे, दीपक मुरग्याप्पा |
| ०८. | सांगली शहरातील अनुदानित महाविद्यालयीन ग्रंथालयातील कर्मचारीवर्गाच्या सद्य:स्थितीचा आढावा | पवार, पूनम पोपट |
| ०९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव : एक अभ्यास | पाटील, कल्पना मधूसुदन |

| अ.क्र. | प्रकल्प विषयाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| १०. | डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालय, जयसिंगपूर ग्रंथालयाचा विकास | पाटील, किरण राजाराम |
| ११. | सांगली शहरातील महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या संगणीकरणाचा अभ्यास | बेडक्याळे, प्रगती दिलीप |
| १२. | ग्रामविकास वाचनालय, मौजे डिग्रज : एक अभ्यास | बोलवडे, विजयकुमार भूपाल |
| १३. | श्रीमंत बाळासाहेब ज्युबिली लायब्ररी, मिरज : एक अभ्यास | भंडारे, अमर विष्णू |
| १४. | श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर ग्रंथालय : एक अभ्यास | भिलवडे, सुनिता फंचू |
| १५. | लोकसेवा संघ वाचनालय, गणेशवाडी : एक अभ्यास | माने, प्रदीप राजाराम |
| १६. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज ग्रंथालयातील वाचनसाहित्य विकास | यादव, स्वाती राजाराम |
| १७. | सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील तंत्रनिकेतन ग्रंथालयांची सद्य:स्थिती : एक अभ्यास | वठारे, सुवर्णा अनिल |
| १८. | विलिंग्डन महाविद्यालय, सांगली ग्रंथालयातील संदर्भसाधनांचा विकास | शरीकमसलत, यास्मीन अब्दुलकरीम |
| १९. | लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या राजनेमी परिसरातील महाविद्यालयीन ग्रंथालयांचा तौलानिक अभ्यास | शिरोटे, सुजाता सुरेश |
| २०. | सार्वजनिक वाचनालय जत : एक अभ्यास | शेजूळ, मिना राजाराम |
| २१. | डॉ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील उपलब्ध शोध प्रबंध / प्रबंधिका : एक अभ्यास | साबळे, वैशाली दत्तात्रय |
| २२. | एन. एस. लॉ कॉलेज, सांगली ग्रंथालय : एक अभ्यास | सुतार, जयश्रीदेवी भगवान |
| २३. | बसवप्रभू कोरे महाविद्यालय, चिक्कोडी ग्रंथालयाचा अभ्यास | हजारे, मंजू गणपतराव |
| २४. | पद्मभूषण वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बुधगाव ग्रंथालयाचा अभ्यास | चव्हाण, शुभांगी संभाजीराव |



## अभ्यासकेंद्र : सोलापूर (संगमेश्वर महाविद्यालय)

| अ.क्र. | प्रकल्प विषयाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| ०१. | बार्शी शहरातील माध्यमिक ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या सेवा : एक अभ्यास | कोत्तावार, सुनिता संजय |
| ०२. | पंढरपूर शहरातील वकिलांच्या माहितीविषयक गरजा | खिलारे, बाळासाहेब श्रीमंत |
| ०३. | सोलापूर शहरातील श्री. ऐ. पदी जैन पाठशाळा संचलित हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, एम. बी. ए. ग्रंथालयाचे संगणीकीकरण | गायकवाड, किरणकुमार विश्वनाथ |
| ०४. | पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे ग्रंथालयातील वाङ्मयीन वाचन-साहित्याचे मूल्यमापन | गायकवाड, धनजंय सदाशिव |
| ०५. | सोलापूर शहरातील सहा कला शास्त्र व वाणिज्य शास्त्र, अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषि आणि शिक्षण शास्त्र या महाविद्यालयातील ग्रंथ खरेदी धोरणाचा तुलनात्मक अभ्यास | चव्हाण, शिवाजी विजयकुमार |
| ०६. | सांगोला महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचा विकासाचा आराखडा | जाधव, मंदाकिनी कृष्णदेव |
| ०७. | मुधोजी महाविद्यालय फलटण ग्रंथालयातील दुर्मिळ वाचनसाधने, त्यांचा उपयोग व जतन | जाधव, विठ्ठल विश्वनाथ |
| ०८. | माळशिरस तालुक्यातील 'ब' वर्गातील सार्वजनिक ग्रंथालयांचा अभ्यास | ढेरे, संजय तानाजी |
| ०९. | माळशिरस तालुक्यातील साखर कारखान्याच्या ग्रंथालयाचा अभ्यास आणि प्रस्तावित विकास आराखडा | देशपांडे, कांचन दत्तात्रय |
| १०. | वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय सोलापूर ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह विकास : एक मूल्यमापन | देशपांडे, सुचित्रा विजयकुमार |
| ११. | सोलापूर शहरातील वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयातील ग्रंथ व ग्रंथेतर साहित्याचे संघटन | देशमुख, मनिषा विठ्ठल |
| १२. | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर महाविद्यालय संगणकीकरणासाठी वापरात असलेल्या संगणक प्रणालीचे मूल्यमापन | पाटील, विजया अशोक |

| अ.क्र. | प्रकल्प विषयाचे नाव | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|---|
| १३. | चार साहित्यिकांच्या साहित्यकृतीचे आशय विश्लेषणाच्या आधारे विषय शीर्षक तयार करणे. | फडतरे, मृदुला देवराव |
| १४. | सोलापूर शहरातील महाविद्यालयामध्ये समाजशास्त्राच्या पुस्तकांची उपलब्धता आणि वापर | मिश्रा, प्रशांत मधूसुदन |
| १५. | सोलापूर शहरातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तनाचा एक अभ्यास | मोरे, अर्चना भानुदास |
| १६. | सोलापूर शहरातील महाविद्यालयामध्ये हिंदी साहित्याची उपलब्धता आणि उपयोग : एक अभ्यास | सरवदे, सुरेखा राजाराम |
| १७. | अकलूजमधील माध्यमिक शाळांतील ग्रंथालयांचे सर्वेक्षण | हुलगे, किशोर ज्ञानदेव |
| १८. | सोलापूर शहरातील 'अ' वर्गातील सार्वजनिक वाचनालयात दलित साहित्याची उपलब्धता व उपयोग | इंगळे, शिवरत्न निजलिंगप्पा |
| १९. | सोलापूर एज्युकेशन सोसायटीचे तंत्रनिकेतन ग्रंथालय सोलापूर : एक अभ्यास | काळे, शरणप्पा रामलिंग |
| २०. | राजभाषा पुस्तकालय, मध्य रेल्वे सोलापूर- अभ्यास | कुलकर्णी, नियती निलेश |
| २१. | सोलापूर शहरातून प्रकाशित होणाऱ्या दै. सकाळ व दै. लोकमत यांचे तुलनात्मक अध्ययन | घंटे, प्रदिपकुमार बाबूराव |
| २२. | सोलापूर शहरातील वरिष्ठ महाविद्यालये व (अ दर्जाचे) सार्वजनिक ग्रंथालयामध्ये चरित्रात्मक साधनाचे सूची नियंत्रण | फुलझळके, रेखा रामचंद्र |
| २३. | लोकमंगल संस्था उद्यानविद्या, कृषी व जैव तंत्रज्ञान महाविद्यालय ग्रंथालय प्रस्थापित विकासाचा आराखडा | मोरे, दत्तात्रय दगडू |
| २४. | सोलापूर शहरातील पत्रकारांच्या माहितीविषयक गरजा व माहितीची उपलब्धता | शिंदे, अतुल नवनाथ |
| २५. | सोलापूर शहरातील माध्यमिक प्रशालेतील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या वाचनाभिरुची : एक अभ्यास | अतनुरे, गौरीशंकर धानप्पा |



## अभ्यासकेंद्र : रत्नागिरी (रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ)

| अ.क्र. | प्रकल्प विषयाचे नाव | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|---|
| ०१. | महर्षी कर्वे वाचनालय, मुरुड : अभ्यास | आर्ते, अपर्णा अविनाश |
| ०२. | रत्नागिरी जिल्हा, चिपळूण तालुक्यातील मराठी माध्यमाच्या शाळांतील ग्रंथालयांची सद्य:स्थिती अभ्यास | बर्वे, राहुल दत्तात्रय |
| ०३. | रत्नागिरी जिल्हा नगर वाचनालय, रत्नागिरी ग्रंथालयाचे संगणीकरण : एक अभ्यास | भाटकर, वैशाली यशवंत |
| ०४. | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी येथील ग्रंथालय व वाचकांचा प्रतिसाद | दुसाने, ज्योती सुनिल |
| ०५. | महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागातील कोकण परिमंडळातील अभियंत्यांची वाचन अभिरुची | धाग, राजेंद्र सदाशिव |
| ०६. | रा. भा. शिर्के प्रशाला ग्रंथालय : अभ्यास | मेश्राम, सुनंदा चंद्रमणी |
| ०७. | गोविंदराव निकम कृषी महाविद्यालय पाळवण - ग्रंथालयाचा अभ्यास | मोहिते, राजेंद्र सदानंद |
| ०८. | अध्यापक कनिष्ठ महाविद्यालय, अबलोली ग्रंथालय : एक अभ्यास | साळवी, संदेश गजानन |
| ०९. | जनसेवा सार्वजनिक ग्रंथालय : एक अभ्यास | सावंत, प्रशांत चंद्रकांत |
| १०. | सार्वजनिक लोकमान्य वाचनालय लांजा : अभ्यास | शेट्ये, जयेश जनार्दन |
| ११. | सार्वजनिक ज्ञानरश्मि वाचनालय, गुहागर : एक अभ्यास | गुरव, धनंजय दत्तात्रय |
| १२. | श्री सद्गुरु लोकमान्य सार्वजनिक वाचनालय, देवरूख : एक अभ्यास | जोशी, मंदार भालचंद्र |
| १३. | महाराष्ट्र शासन शासकीय जिल्हा ग्रंथालय, रत्नागिरी : एक अभ्यास | मराठे, मेघना महादेव |
| १४. | कवी केशवसुत सार्वजनिक वाचनालय, मालगुंड : एक अभ्यास | मालप, आरती वसंत |
| १५. | राजापूर तालुका सार्वजनिक वाचनालय, ग्रंथालय व वाचनालयाचा अभ्यास | वरवडेकर, मनिषा प्रकाश |
| १६. | खेड नगर वाचनालयाचा अभ्यास | करकरे, स्मिता श्रीकांत |
| १७. | भाईसाहेब सावंत अध्यापक महाविद्यालय, सावर्डे : ग्रंथालयाचा अभ्यास | शिरोळे, प्रभाकर अनंत |
| १८. | चिपळूण येथील लोकमान्य टिळक स्मारक वाचनालय : एक अभ्यास | यादव, क्रांती कृष्ण |

## अभ्यासकेंद्र : कोल्हापूर (विवेकानंद कॉलेज)

| अ.क्र. | प्रकल्प विषयाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| ०१. | कोल्हापूर शहरातील कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयीन ग्रंथालयातील संगणकीकरणाची सद्य:स्थिती | अस्वले, प्रणाली लक्ष्मण |
| ०२. | कै. सुशिला मगदूम ग्राम वाचनालय भडगाव : एक अभ्यास | आरेकर, रेखा तानाजी |
| ०३. | आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, पेठ वडगाव, ग्रंथालय वाचकांचा अभ्यास | कमते, गीता बळवंत |
| ०४. | चिकोडी येथील बसवप्रभू कोरे महाविद्यालय ग्रंथालय विकास आणि वाटचाल | कांबळे, संतोष वसंत |
| ०५. | कमला कॉलेज, कोल्हापूर : ग्रंथालयाच्या वरिष्ठ महाविद्यालयाच्या वाचकांचा अभ्यास | कुलकर्णी, शिल्पा अरुण |
| ०६. | फडके प्रकाशन संस्था, कोल्हापूर : एक अभ्यास | कोल्हटकर, नेत्रा सुहास |
| ०७. | कृष्णा महाविद्यालय, रेठरे बुद्रुक वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी वाचकांचा अभ्यास | गुरव, विनायक विलासराव |
| ०८. | शारदा वाचनालय, वारणानगर व महात्मा वाचनालय, बहिरेवाडी वाचक सेवा व सुविधांचा तौलनिक अभ्यास | जाधव, संदीप बाळासाहेब |
| ०९. | व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी ग्रंथालयांच्या वाचकांचा अभ्यास | दामले, तनुजा गुलाब |
| १०. | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात सादर केलेल्या प्रकल्पातील उल्लेखांचे विश्लेषण | देवकर, अनिलकुमार अर्जुन |
| ११. | कोल्हापूर शहरातील गोपाळकृष्ण गोखले वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थी वाचकांचा अभ्यास | नामे, शैलजा शामराव |
| १२. | श्री शाहू तरुण मंडळ, सार्वजनिक वाचनालय, सिद्धनेर्ली : वाचकांचा अभ्यास | निकम, चंद्रकांत दिनकर |
| १३. | मुरगुड येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयातील ग्रंथालयीन वाचकांचा अभ्यास | पवार, उदय विष्णुपंत |



| अ.क्र. | प्रकल्प विषयाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
